SARTHAK
WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*

## वार्षिक अहवाल
## २०२१–२२



# सार्थक निरंतर

निरंतर चालत राहावे मानवतेचे सेवाव्रत...
समृद्ध होता मधुसंचयाने, जगणे व्हावे सार्थक ।।

www.sarthakwelfarefoundation.org
www.facebook.com/Sarthak Welfare Foundation/
makealifemeaningfull@gmail.com
contactsarthakfoundation@gmail.com



# SARTHAK

WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*

# सार्थक निरंतर

## वार्षिक अहवाल २०२१–२२



## Our Mission

Creating a small yet sustainable positive change in our society by reaching out to every individual every day; collectively working towards making a worthwhile contribution to positive and progressive human development.

## Counsellors & Trainers

| | | | |
|---|---|---|---|
| Seemantini Gokhale | Sandhya Patil | Manali Umranikar | Shekhar Joshi |
| Manjiri Takle | Karuna More | Rashmi Patwardhan | Sunil More |
| Meghali Raje | Archana Joshi | Neeta Kulkarni | Prakash Avachat |
| Anagha Hanamsagar | Shefali Phalak | Manjiri Laghate | Dr. Smita Sohoni |



**Dr. Vishnu.R. Marathe**
(Our founder)

## Board of Directors

**Dr. Vishnu R. Marathe**
Founder President

**Mrs. Swati Pradip Namjoshi**
Executive Director

**CA Pradip Namjoshi**
Director & CFO

**Mrunal Rajhans**
Chief Executive Officer

## Mentor & Advisor

Dr. Shreeram Geet
Pushkar Aurangabadkar
Dr. Shirisha Sathe
CA Kedar Sabne

## Sarthaks Team

**Mrunal Rajhans**
Chief Operation Officer

**Sangita Sabnis**
Project Head

**Anjali Pitke**
Accounts & Admin

**Trupti Joshi**
Accounts & Audit

**Sangram Madne**
Project Coordinator

**Akshay Khollam**
Project Coordinator

## संपादकीय

- स्वाती नामजोशी
- मृणाल राजहंस
- शेखर जोशी
- अंजली पिटके

अपेक्षा अंकाची...

| पान क्र. | लेख । लेखकाचे नाव |
|---|---|
| २ | मनोगत । स्वाती नामजोशी |
| ४ | सार्थक अहवाल २०२१-२२ । मृणाल राजहंस |
| ६ | माणूस आणि निरंतरता । शेखर जोशी |
| ८ | सातत्य- यशाची गुरुकिल्ली! । सीमंतिनी गोखले<br>शब्दांकन– शेखर जोशी |
| १० | मुलगी शिकावी म्हणून-प्रोजेक्ट विद्या! अनघा हणमसागर<br>मंजिरी टकले |
| १४ | What do you want to be ...? मेघाली राजे<br>मनाली उमराणीकर |
| १६ | सातत्य- चिकाटी व प्रयत्नांचे । मुलाखत– मंजिरी टकले. |
| १९ | ग्रेट भेट!! । मृणाल राजहंस |
| २० | इवलेसे रोपं-प्रोजेक्ट शिक्षाची यशस्वी वाटचाल..... । करुणा मोरे |
| २१ | मोगरा फुलला!-सार्थक मैत्र प्रकल्प । अंजली पिटके<br>संगीता सबनीस |
| २३ | व्यक्त व्हा ! (कविता) । स्वाती नामजोशी |
| २४ | भाव भोळे हृदयीचे (कविता) । गायत्री दिलीप सोनवणे |
| २५ | A New Girl In The City !! हर्षदा कामठे |
| ३० | पहिला पाऊस....(कविता) । अक्षय खोल्लम |
| ३१ | The key to an Inspiration *Gayatri Parsaya* |
| ३२ | A journey that has just begun... *Sanket Mainderkar* |
| ३३ | धडपडणाऱ्या मुलांची गोष्ट । स्वाती नामजोशी |
| ३५ | Donors & Well Wishers |
| ३६ | Associates |

SARTHAK
WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*

# १ मनोगत




नमस्कार!

आज सार्थक पाचवे वर्ष पूर्ण करुन सहाव्या वर्षात पदार्पण करत आहे. अशा वेळी आपल्या सर्वांच्या हातात हा अहवाल देताना मला आनंद आणि अभिमान वाटत आहे.

कोठल्याही संस्थेकरता, पाच वर्षांचा टप्पा हा मैलाचा दगड मानला जातो. खास करुन सेवाभावी संस्थेची पहिली पाच वर्षे म्हणजे संस्थेने तग धरुन राहण्याच्या दृष्टीने खरी कसोटीची मानली जातात. काही विशिष्ट हेतू किंवा उद्देश मनात धरुन संस्थेची सुरवात होते, योजना केल्या जातात, निधीच्या उपलब्धतेची व विनीयोगाची, प्रकल्पांची काही कोष्टके मांडली जातात. पण अचानक परिस्थिती बदलते, काही योजना फसतात, आडाखे चुकतात, आणि अशा वेळी संस्थेचे काम ठप्प होण्याची शक्यता असते. त्यामुळेच आपली स्वत:ची किंवा संस्थेची उद्दिष्टं ठरवतानासुद्धा, ती साध्य करायच्या पद्धतीत काळानुरूप बदल करायची लवचिकता व उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी करायच्या प्रयत्नांचे सातत्य ह्या दोन्ही गोष्टींचा समतोल कायम ठेवावा लागतो. काही वेळा आपली अंतिम उद्दिष्टे तीच राहतात पण त्या ध्येयापर्यंत पोहोचायच्या पायऱ्या किंवा टप्पे यांच्यामधे जाणीवपूर्वक बदल करणं अत्यावश्यक होऊन जातं.

Change is the only constant thing... असा एक वाक्प्रचार इंग्रजीमधे आहे. कुठल्याही प्रकारचा बदल ही अचानक घडणारी प्रक्रिया नसते, एखाद्या नदीचा प्रवाह जसा वरती बघता संथ झालेला दिसतो पण तो कायम वाहता असतो त्याचप्रमाणे कुठल्याही समाजात, समाजातील प्रत्येक स्तरांमधे, त्यातील प्रत्येक घटकांमधे व त्यांच्या मानसिकतेमधे निरंतर बदल होत असतो. युद्धजन्य परिस्थिती आणि पॅन्डेमिक वगळता कोठलाही बदल हा एका रात्रीत होत नाही. काही वर्षांपूर्वी कोविड सारख्या संकटाची कल्पना सर्व सामान्यांना तर सोडाच पण विचारवंतांना किंवा वैज्ञानिकांना देखील आली नव्हती. कोविडने आपलं आयुष्य आणि दैनंदिन जीवन अमूलाग्र ढवळून टाकलं आणि एखाद्या पॅन्डेमिकमुळे येणारी अनिश्चितता आमच्या आणि तरुण पिढीने पहिल्यांदाच अनुभवली. कोविडमुळे बदललेल्या



जीवनशैलीचे व परिणामांचे दृष्य स्वरूप जरी काही काळापुरते मर्यादित दिसत असले तरी त्यामुळे आपल्या विचारांमधे व मानसिकतेमधे बदल झाला आहे व पुढेदेखील होणार आहे हे मात्र नक्कीच!

सार्थकच्या निरंतर चालणाऱ्या उपक्रमांमध्येदेखील हा विचार आम्हाला करावा लागला. एकीकडे आमच्या मुलांपर्यंत म्हणजेच सार्थकच्या लाभार्थीपर्यंत पोहोचायची व संपर्काची माध्यमं म्हणजेच शाळा, कॉलेजेस बंद झाली तर दुसरीकडे, कोविडच्या अवघड परिस्थितीत मुलांना मदतीची जास्तीत जास्त गरज निर्माण झाली आहे हे लक्षात येऊ लागले. कोविडने युद्धजन्य परिस्थिती निर्माण केलेली होती. अशा वेळेस, आमच्या इतर प्रकल्पांना थोडीशी स्थगिती देऊन आम्ही आमचे सगळे प्रयत्न कोविडबाधितांपर्यंत अन्नधान्य, औषधे अशी मदत पोहोचवण्यासाठी आणि आमच्या मुलांच्या शिक्षणासाठी एकवटले आणि सार्थक मैत्र च्या अंतर्गत जास्तीत जास्त मुलांपर्यंत आमची शैक्षणिक मदत पोहोचेल, त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित राहील, त्यांना नैराश्य येणार नाही, या करताचे एकत्रित काम निष्ठेने आणि चिकाटीने करत राहिलो. याचाच दृष्य परिणाम म्हणुन, आमच्या एकाही विद्यार्थ्यांनी या अवघड काळात शिक्षणाकडे पाठ फिरवली नाही किंवा कोणीही निराश झाले नाहीत. त्यांनी त्यांचा लढा चालूच ठेवला. येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीला ते धीराने सामोरे गेले. आज आमच्या मुलांपैकी काही जण नोकरीला लागले आहेत, सन्मानाने अर्थार्जन करत आहेत, वेगवेगळ्या परीक्षांमध्ये उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण होत आहेत, संस्थेला मिळणाऱ्या मानसन्मानापेक्षा, आमच्या कामाची ही पावती माझ्या दृष्टीने अधिक आनंददायक आहे.

संस्थेने ठरवलेल्या उद्दिष्टांवर विश्वास ठेऊन सातत्याने, न थकता काम करत राहणं आणि आपलं संपूर्ण योगदान देणं हे अवघड काम निष्ठावान सहकारी करत असतात. सार्थकची पाच वर्षे म्हणजे आमच्या सहकाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे, योगदानाचे आम्हाला मदत करणाऱ्या प्रत्येकाच्या पाठबळाचे आणि आमच्या हितचिंतकांच्या शुभेच्छांचे फलीत आहे असं मी मानते.

मला आज सांगायला आनंद व समाधान वाटतं की गेल्या पाच वर्षांत अनेक समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणे राबवले गेले, त्याचप्रमाणे पाच वर्षांपूर्वी केवळ १५ मुलांबरोबर सुरू झालेल्या आमच्या सार्थक मैत्र या mentoring प्रकल्पाअंतर्गत आत्तापर्यंत ३५० वरती मुले सहभागी झाली आहेत. अजून हजारो मुलांपर्यंत पोहोचायचा संकल्प सोडला आहे. आपल्या सर्वांच्या पाठबळाने तो लवकरच साध्य व्हावा हीच ईश्वरचरणी प्रार्थना!



**स्वाती नामजोशी**
कार्यकारी संचालक
सार्थक वेलफेअर फौन्डेशन

***Success is the sum of small efforts,***
***repeated day in and day in and day out.***

**Robert Collier**

# २ सार्थक अहवाल २०२१-२२

SARTHAK WELFARE FOUNDATION

सार्थकच्या स्थापनेस आज पाच वर्ष पूर्ण होत आहेत. ही पाच वर्षे म्हणजे आंम्हा सर्वांसाठी खूपच मौल्यवान असा कालखंड होता. सोने जसे तापवल्यानंतर अधिक चकाकू लागते त्याचप्रमाणे सार्थकच्या टीममधील आम्हा सर्वांना या पाच वर्षांनी अधिक प्रगल्भ, अनुभवसमृद्ध केले यात वाद नाही.

कोणतीही संस्था जेव्हा नावारूपाला येते तेव्हा अनेक तज्ञ मंडळींचे योगदान, त्यांची मेहेनत यात सामील असते. तद्वतच सार्थकच्या उभारणीतही अनेक क्षेत्रातील तज्ञ, व हुशार मंडळींचा सहभाग आहे. त्यांच्या सहकार्याने आणि कार्यकुशलतेमुळे शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास, मेंटरिंग अशा विविध क्षेत्रात सार्थकने अनेक प्रकल्प यशस्वी रीतीने पूर्ण केले आणि आजही अनेक प्रकल्प सुरू आहेत.

मागील वर्षी कोविडमुळे सुरुवातीचे काही महिने प्रत्येकाने आपापल्या घरात बसूनच मुलांशी फोनवरून संवाद साधला. त्यांचे फोनवरून समुपदेशन केले, त्यांना मानसिक आधार दिला. आपल्या प्रोजेक्टमधील मुलांना त्या काळात खरोखरी खूपच आव्हानात्मक आणि बिकट परिस्थितीचा सामना करावा लागला. आधीच हालाखीची परिस्थिती, कोविडमुळे थांबलेले उत्पन्न आणि त्यातच भरीत भर कोविडसारखे आजारपण, हॉस्पिटलचा खर्च आणि यातून आलेली हतबलता! अशा एक न अनेक संकटातून आपली मुले जात होती. काही मुलांना त्यांचे आईवडिलांचे छत्रदेखील गमवावे लागले. या कठीण परिस्थितीत मुलांशी सतत बोलत रहाणे, त्यांना काय हवे नको ते बघणे, त्यांच्या घरी शिधा पोहोचवणे, ही सगळी कामे आपल्या टीमने कुठेही कुचराई, दिरंगाई न करता, सामाजिक भान जपत पूर्ण केली. ऑफिसमधील संग्राम मदने, अक्षय खोल्लम आणि अंजली पिटके यांचा मला आवर्जून उल्लेख करावा वाटतो. या तिघांनी उत्कृष्ट समन्वय साधत दिलेली सर्व जबाबदारी नेटाने पार पाडली.

त्या काळात मुलांना कुठेतरी वेगळ्या विचारात गुंतवणे, त्यांचे मनोबल वाढवणेही तितकेच महत्त्वाचे होते. त्याकरता आपल्या सर्व प्रकल्पातील मुलांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन केले गेले. जवळपास सर्वच मुलांनी त्यात उत्साहाने भाग घेतला. त्यातून निवडल्या गेलेल्या सर्वोत्कृष्ठ निबंधांना पारितोषिक देण्यात आले. परिस्थितीची जाणीव ठेवून, समाजसेवेच्या भावनेने आपल्या काही मुलांनी कोविड सेंटरमध्येही स्वयंसेवकाचे काम केले. त्याचबरोबर संस्थेने मानव सेवा प्रकल्पालाही औषधांसाठी व कोविड रुग्णांच्या मदतीसाठी अर्थसहाय्य केले.

मागील वर्षीपासून Opus Consulting Solution या software कंपनीसोबत सार्थकने विविध प्रकल्पांना सुरुवात केली आहे. ओपस–शाश्वत ग्रामविकास कार्यक्रमांतर्गत श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव व परिसरातील इतर गावांमधील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप व इतर शैक्षणिक मदत या उपक्रमांतर्गत, ५०मुलांचे सार्थकने शैक्षणिक पालकत्त्व स्वीकारले आहे व त्या मुलांना आपल्या सर्वांगीण विकास कार्यक्रमात सहभागी करून घेतले आहे. या उपक्रमाची सुरुवात तेथील मुलांना शिधा वाटपाने झाली. कोविड काळामध्ये सार्थक ऑफिसमधील टीमने प्रत्येक घरात जाऊन शिधा वाटप केले. आमच्या सहकारी अर्चना जोशी, करुणा मोरे यांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग घेतला.

मला तुम्हाला सांगायला अत्यंत आनंद होतो की, महाराष्ट्र टाईम्सच्या 'बळ हवे पंखांना' या उपक्रमांतर्गत अत्यंत हुशार परंतू आर्थिकदृष्ट्या कमकुवत मुलांसाठी आर्थिक मदतीचे आव्हान केले जाते आणि त्यातून जमा होणाऱ्या निधीचा उपयोग शिष्यवृत्तीधारक मुलांच्या पुढील शिक्षणासाठी केला जातो. या त्यांच्या मदतीबरोबर एक पाऊल पुढे जाऊन मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सार्थक आता मटा स्कॉलरशिप धारक विद्यार्थ्यांबरोबर जोडले गेले आहे. आपण या मुलांच्या सर्वांगीण कौशल्य विकासाची संपूर्ण जबाबदारी उचलली आहे.

करिअर घडवणं हा एक निर्णय नसून आपल्या क्षमता, उणीवा, आपली स्वप्नं आणि आपली ध्येयं ओळखून त्या दिशेने वाटचाल करणं, वाढत राहणं आणि प्रगती करणं असा एक प्रवास आहे. तिथे नवीन वाटा शोधायच्या असतात आणि त्याचच पायवाटात रुपांतर करायचं असतं. यात जर उत्तुंग यश मिळालं तर याच पायवाटा राजरस्ते बनतात आणि तुम्ही इतरांचे 'रोल मॉडेल'!

या ध्येयप्राप्तीच्या प्रवासात गरज असते ती अनुभवी मार्गदर्शकाची! आणि नेमकी हीच गरज ओळखून आपल्या प्रत्येक प्रकल्पातील मुलांची कल–क्षमता चाचणी घेणं आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सार्थकमधील करिअर समुपदेशक मंजिरी टकले, सिमंतीनी गोखले, मेघाली राजे यांनी पार पाडली आणि त्यानंतरही करिअरच्या प्रत्येक टप्प्यावर मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी आपली तज्ञ मंडळी कायमच तत्पर आहेत. त्याच बरोबरीने विविध शाळांमध्ये जाऊन दहावी, बारावीच्या मुलांना मोफत करिअर मार्गदर्शनाची सत्रेही सार्थकतर्फे घेण्यात येतात व या सत्रांचा मुलांना खूप उपयोग होतो असे आमचे निरीक्षण आहे.

सार्थकच्या शिरपेचातील अजून एक मानाचा तुरा म्हणजे आमचे सर डॉ श्रीराम गीत यांच्या ‘करिअरचा वाटाड्या’ या पुस्तकाचे प्रकाशन! मला सांगायला अत्यंत अभिमान वाटतो की, माझ्यासहित करिअर दिशा मधील सर्व करिअर कौन्सेलरची टीम ही गीत सरांची शिष्यमंडळी! गीत सर हे आमच्यासाठी एक ऋषीतल्य व्यक्तिमत्त्व आहे, तेव्हा गुरूंच्या पुस्तक प्रकाशनात शिष्याचा सहभाग ही माझ्यासाठी खूपच अभिमानाची गोष्ट आहे. सरांचे पुस्तक हे तमाम विद्यार्थ्यांसाठी, त्यांच्या पालकांसाठी आणि आमच्यासारख्या करिअर कौन्सेलर्ससाठी ‘करिअर गीता’च आहे. अत्यंत ओघवती आणि सर्वांना समजेल अशी भाषा, अगदी शालेय शिक्षणापासून ते परदेशी उच्च शिक्षणापर्यंत घेतलेला करिअरचा धांडोळा आणि पालकांना व मुलांना करिअरचे वास्तवातील जग दाखविण्याची त्यांची हातोटी ही सरांच्या पुस्तकाची वैशिष्ट्ये सांगता येतील. गेली २०–२२ वर्षे हजारो मुलांना त्यांनी करिअरची वाट दाखवली आहे. राजहंस प्रकाशनाच्या कार्यालयात पार पडलेल्या सोहळ्याचे यजमानपद भूषविण्याची संधी सार्थकला मिळाली हे मी आमचे अहोभाग्य समजते.

कल्याणी टेक्नोफोर्ज बरोबर सार्थक गेली ३ वर्षे सातत्याने काम करत आहे. हे चौथे वर्ष आहे. सलग चौथ्या वर्षी सार्थकला KTFLसोबत काम करण्याची संधी मिळणे ही आपण आजवर केलेल्या कामाची पावतीच आहे. याचे श्रेय KTFL टीममध्ये झोकून देऊन, मनापासून काम करणाऱ्या अनघा हणमसागर, मंजिरी टकले, करुणा मोरे, शेफाली फालक, मेघाली राजे, मनाली उमराणीकर या माझ्या मैत्रिणींना जाते.

KTFLच्या प्रोजेक्ट विद्या विषयी जेव्हा आम्ही Tenecco च्या तुषार पवार यांच्याशी बोललो तेव्हा त्यांना ही संकल्पना खूपच आवडली व त्यांनीही त्यांच्या कंपनीच्या आसपासच्या म्हणजे खेड, चाकण या भागात असाच प्रकल्प कार्यान्वित करण्याची इच्छा प्रदर्शित केली व लगेचच प्रकल्पाला सुरुवातही झाली. आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून दोंदे या गावात महिलांसाठी आरोग्य शिबीर घेऊन प्रत्यक्ष कामाची मुहूर्तमेढ रोवली गेली. या शिबीराला तेथील महिलांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला व आता खेड, चाकण मधील हुशार व होतकरू विद्यार्थिनींची निवड करून त्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

या वर्षात घडलेली आणखी एक महत्त्वाची आणि सार्थकसाठी व आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट म्हणजे सार्थकच्या कार्याची विविध सामाजिक संस्थानी घेतलेली दखल! सार्थकची धुरा समर्थपणे आपल्या खांद्यावर पेलणाऱ्या सार्थकच्या डायरेक्टर स्वाती नामजोशी यांना रोटरी District व कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या Hiraben Nanavati Institute of Management Studies तर्फे Woman Achiever & Work Excellence Award ने सन्मानित करण्यात आले. सार्थकसाठी घेत असलेल्या अविरत आणि अथक परिश्रमांची घेतलेली ही दखल आहे असे मला वाटते.

There is neither greater joy nor greater reward than to make a fundamental difference in someone’s life या उक्तीनुसार गरजू मुलांना शिष्यवृत्ती देणे असो, त्यांचे शैक्षणिक पालकत्त्व स्वीकारणे असो, त्यांना laptop देणे असो किंवा त्यांना वैद्यकीय मदत करणे असो.... सार्थकच्या कुटुंबातील प्रत्येक मुलगा किंवा मुलगी हे कुठल्याही आणीबाणीच्या प्रसंगी सार्थककडे आपले एक हक्काचे ठिकाण म्हणून बघतात आणि एका कुटुंबाप्रमाणे सार्थकमधील प्रत्येक सदस्य त्यांच्या सुखदु:खात त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा रहातो आणि या पाच वर्षातील हेच फलित आहे.

कामाचा विषय आणि आवाका इतका प्रचंड आहे की इतक्या कमी वेळात पूर्णपणे हा पट उलगडून दाखवणे केवळ अशक्य आहे! तरीही मोजक्या शब्दात सार्थकची वाटचाल तुम्हा सगळ्यांसमोर पोहोचवण्याचा हा अल्पसा प्रयत्न!

तुम्हा सगळ्यांच्या सहकार्याने सार्थकचा हा दीप अखंड तेवत राहो आणि अधिकाधिक आयुष्य या दिव्याने प्रकाशमय होवोत हीच ईश्वरचरणी प्रार्थना!!!



**मृणाल राजहंस.**
प्रमुख कार्यकारी अधिकारी
सार्थक वेलफेअर फौन्डेशन

# ३ माणूस आणि निरंतरता

SARTHAK
WELFARE FOUNDATION

मंडळी, आपल्या सार्थक परिवाराचे हे यशस्वी पाचवे वर्ष ! यंदा आपल्या वार्षिक अहवालाची संकल्पना आहे – निरंतरता... सातत्य !

मित्रांनो, या विषयावर मी जसजसा विचार करू लागलो, तसतसे या अनुषंगाने मला 'सातत्य' या शब्दामागील अनेक पैलू... विविध कंगोरे जाणवू लागले. खुणावू लागले ! 'बदल' हा सृष्टीचा स्थायीभाव ! बदल होणे ही सुद्धा सतत होणारी एक प्रक्रियाच. जन्माला येणाऱ्या प्रत्येक जीवाला प्रत्येक क्षणाला बदलाला सामोरे जावे लागते. बाह्य शारीरिक बदल हळूहळू जाणवतात. मात्र अंतर्गत बदल आपल्याला जाणवत देखील नाहीत. क्षणोक्षणी हजारो पेशी मृतवत होतात आणि तितक्याच नव्याने जन्म घेतात. हाही बदलच ! हेदेखील वेगळ्या दृष्टीने सातत्यच नव्हे का?! मानव, प्राणी, वनस्पती...अगदी जीवजंतू देखील या स्थित्यंतरातून जात असतात. आपण सजीव असल्याने आपण कणाकणाने मोठे होत असतो. सातत्य हे केवळ जीवजंतूंसाठीच नव्हे तर निर्जीव गोष्टींसाठी देखील लागू होते. एक उदाहरण देतो – लाखो वर्षे आपली सूर्यमाला आणि आकाशगंगा अस्तित्वात आहे. या सूर्यमालेतील ग्रहगोलांचे फिरणे हे सुद्धा सातत्य नव्हे काय ?

असे म्हणतात ना की जगात कोणतीही गोष्ट अशक्य नाही–मनापासून आवड हवी. कधी कधी आव्हानं आपल्याला शिकवतात – वेगळ्या गोष्टी शिकण्याची, करण्याची संधी मिळते. त्या संधींचे सोनं करायचं की माती? हे आपल्यावर अवलंबून असतं ! कोरोना काळात जगावर मोठं संकट आलं. अजूनही ते संपलेले नाही. या महामारीच्या आव्हानामुळे अनेक व्यक्ती आणि कुटुंबांची वाताहात झालेली आपण अनुभवली. याच पार्श्वभूमीवरील एक बातमी अलीकडेच माझ्या वाचनात आली. लॉरेन फ्लायमन या ब्रिटिश तरुणीची ही बातमी. वय वर्षे तीस. एका कंपनीसाठी सेल्स मॅनेजरचे काम ती करत होती. या कामात प्रवास अटळ ! कोरोनाकाळात ग्राहकांना भेटण्यासाठी करावा लागणारा प्रवास थांबला... तसंच कामही..! रोजगार गेला. काही छोटी–मोठी कामं करून पहिली. पण त्यात तिला रस वाटेना. शारीरिक तंदुरुस्ती रहावी, म्हणून ती जिममध्ये जायची, दोरीवरच्या उड्या मारायची. जिम बंद झाली... पण घरात व्यायाम आणि त्यातही आवडीच्या दोरीवरच्या उड्या मारणं मात्र सुरूच राहिलं! काही काळानंतर ती एका 'जम्पिंग रोप क्लब'ची सदस्य झाली. दोरीवरच्या वेगवेगळ्या प्रकारच्या उड्या मारण्याचे कौशल्य मिळविण्यासाठी ती रोज घरीच सराव करू लागली. हळूहळू ती यात पारंगत झाली. इतकी की, एखादी जिमनॅस्ट जितक्या सहजपणे अवघड कसरती करू शकते, तितक्याच सहजतेने वरकरणी दिसायला सोप्या पण अत्यंत लयबद्ध आणि लालित्यपूर्ण रीतीने ती आता दोरीच्या उड्या मारू लागली. तिने त्यात प्राविण्य मिळवलं. सोशल मीडियावर तिने आपल्या या उड्यांचे शेकडो व्हिडीओ पोस्ट केले. बघता–बघता हे व्हिडीओ सर्वदूर गेले आणि रातोरात ती एक 'स्टार' झाली. तिला इतकी प्रसिद्धी मिळाली, की अनेक कंपन्यांनी लॉरेनला ब्रँड अँबेसेडर म्हणून मोठाल्या रकमा देऊ केल्या. काही महिन्यांपूर्वी जॉब शोधणारी... खायची भ्रांत असलेली लॉरेन अक्षरश: मालामाल झाली! लॉरेनने एका मुलाखतीत सांगितलेले एक वाक्य मला स्वत:ला खूप आवडले. ती म्हणते – 'केवळ एक दोरी माझ्या आयुष्याची दोरी इतकी बळकट करेल आणि माझं भाग्य बदलून टाकेल, असं मला स्वप्नातही वाटलं नव्हतं !'

मित्रांनो, आव्हानं ही माणसाला संधी शोधण्यासाठी प्रेरणा देतात, यावर विश्वास ठेवूया. लॉरेनने दोरीच्या विविध उड्या नुसत्या शिकून घेतल्या नाहीत, तर त्या उड्यांचा रोजच्या रोज तासनतास सराव केला... हे सातत्य.

लहान मूल उभं राहण्याचा प्रयत्न करते... हळूहळू एक एक पाऊल टाकायचा प्रयत्न करते. सुरुवातीला ते मूल पडते... पुन्हा उठते... पुन्हा प्रयत्न करते... आपल्या पायांवर तोल सांभाळण्याचा सराव करू लागते... आत्मविश्वास वाढला की आणखी दोन–चार पाऊले टाकते–चालायला शिकते आणि मग त्याला तोच नाद लागतो–त्यातून त्याचा आत्मविश्वास वाढीला लागतो. अधिक चालणे...अधिक सराव...कौशल्य वृद्धी ! हे अधिक म्हणजेच सातत्य !

सातत्य म्हणजेच सराव... सराव म्हणजेच सातत्य – पुन:पुन्हा करण्याचा ध्यास ! हिंदीमध्ये सातत्य या शब्दासाठी छान शब्द

आहे – 'अभ्यास करना'. आवडती गोष्ट करण्याची खूणगाठ पक्की झाली की ती गोष्ट करण्याचा मनाला ध्यास लागतो. ध्येयपेरणी होते, उमेद जागी होते... सराव आवडू लागतो. त्यातून स्वत:ला सिद्ध करण्याची मनीषा मनात जोर धरू लागते. स्वप्नांना पंख फुटतात आणि मग आकाश खुले होते. यश खुणावू लागते... यशाची गुरुकिल्ली सापडते. मग मागे वळून पाहण्याचा प्रश्नच उरत नाही. अशा व्यक्तीला मग कुणीही मागे खेचू शकत नाही, थोपवू शकत नाही !

आजवर जगातील विविध देशांतील प्रसिद्ध पावलेल्या यशस्वी व्यक्तींच्या यशाचा मागोवा घेतला, तर त्यातून एकच बाब नजरेत भरते, ती म्हणजे या मंडळींनी ज्या क्षेत्रात पाऊल टाकले, त्या वाटेवर अक्षरश: स्वत:ला झोकून दिले. मग ते क्षेत्र कोणतेही असो. कलेच्या प्रांगणातील विविध प्रकार – संगीत, साहित्य, नृत्य, अभिनय. खेळ, संशोधन, विज्ञान–तंत्रज्ञान, समाजसेवा, देशसेवा... क्षेत्र कोणतेही असो. त्यात रममाण झालेली मंडळी ही आपल्यासाठी दीपस्तंभ होतात. मार्गदर्शक होतात. प्रेरणादायी होतात.

भारतीय उद्योग विश्वाचे प्रणेते जमशेटजी टाटा यांनी एकोणिसाव्या शतकात मोठी स्वप्ने पहिली. ती स्वप्ने पूर्ण करण्याचा ध्यास घेतला आणि सातत्याने त्या ध्यासांना आकार दिला. त्याच सुमारास जन्म घेतलेले थोर गणिती रामानुजन, त्यानंतर जन्मलेल्या शकुंतला देवी, कुष्टरोग्यांसाठी झटणारे बाबा आमटे, शास्त्रीय संगीत वादनात आपला ठसा उमटविणारे रविशंकर, भारतरत्न भीमसेन जोशी, एव्हरेस्ट शिखर सर करणारी पहिली भारतीय महिला गिर्यारोहक बछेन्द्री पाल, कृत्रिम पाय असूनही जगातील सर्वात उंचीच्या शिखरावर गर्वाने उभी राहणारी अरुणिमा सिन्हा, अणुशास्त्रज्ञ होमी भाभा, क्रीडा क्षेत्रात सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर, साहित्यात नोबेल पारितोषिक मिळवणारे रवींद्रनाथ टागोर... अशा अनेक ख्यातकीर्त भारतीयांनी केवळ सातत्य राखल्याने इतिहास रचला ! प्रगती केवळ सातत्यामुळे होते, हे लक्षात ठेवुया. जगातील कोणत्याही क्षेत्रातली उंच शिखरे सर करायची तर सराव हवा... आपल्या कामगिरीचा आलेख अधिक उंचावर न्यायचा असेल, तर आपल्या विचारांत, नियोजनात आणि कृतीत सातत्य ठेवणे अतिशय मोलाचे असते, हे लक्षात ठेवूया.

आपल्या सार्थक संस्थेचे उदाहरण घेऊया. समाजसेवेचे व्रत मनात ठेऊन या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली. असं म्हणतात – 'अगर आपका सपना बडा हो, तो आपको साथ जरूर मिलती है'. ध्येयाने प्रेरित असलेली चांगली माणसं... मजबूत हात, आणि कणखर मनं सोबतीला येतात. चळवळ उभी राहते. आज सलग पाच वर्षे सार्थक आपलं क्षितिज विस्तारतय... विविध अंगांनी सार्थक बहरतय ! काही उदाहरणे द्यायचीच तर शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनींना मार्गदर्शन, आरोग्यम, समवेदना, लाईफ स्किल्स, घरकाम करणाऱ्या महिला आरोग्य, गाव पातळीवरील समाजकार्य, तांत्रिक शिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण वर्ग... कौशल्य वृद्धी... प्रकल्पांची यादी भली मोठी होईल. दरवर्षी निरनिराळे प्रकल्प आकार घेत आहेत. मेंटरींग प्रकल्पाची शाखा खूपच विस्तीर्ण झाली आहे. लाभार्थी संख्या वाढली आहे. हे आहे सातत्य ! कालानुरुप बदल करत, उद्योग विश्वातील आस्थपानांच्या सोबतीने समाजातील गरज ओळखून 'सार्थक' आपली आश्वासक पावलं घट्टपणे रोवत पुढे पुढे जातेय. सार्थकच्या यशाचे गुपित या निरंतरतेने कार्यरत राहण्यात आहे. सातत्याने झटण्यात आहे. सातत्य हे निसर्गाचा एक अविभाज्य भाग आहे. म्हणूनच आपण हे सातत्य कायम जपायला हवे. नव्हे, ही आपली निसर्गदत्त जबाबदारी आहे, असे माझे मत आहे.

हे विचार वाचून आपण हे उत्तरदायित्व मान्य करूया आणि आपल्याला समृद्ध करण्याच्या प्रक्रियेला गतिमान करूया. सार्थकच्या प्रयत्नांना बळ देऊया आणि यशस्वी होऊन समाजासमोर चांगले उदाहरण ठेवण्याचा प्रयत्न करूया. सार्थकशी जोडल्या गेलेल्या प्रत्येकाने हे वचन पाळूया. प्रयत्नांच्या सातत्याने आपल्या जीवनाचे सार्थक नक्की होईल, यावर विश्वास ठेवूया.

या वर्षी आपली श्सातत्य–निरंतरता' ही टॅग लाईन आहे. जे क्षेत्र आपण निवडलंय, त्यात आपण सगळे सातत्याने झटुया. 'सार्थक' संस्था आपल्यासाठी झटते आहे. आपल्या जीवनाचे सार्थक व्हावे यासाठी कार्य करते आहे... याचा विसर पडू देऊ नका. जे, जे लाभार्थी आहेत, त्यांनी जमेल तेव्हा, जमेल त्या रीतीने सार्थकचे पांग फेडूया. स्वत:ला सिद्ध करताना 'सार्थक' च्या यशाचा झेंडा फडकवीत राहूया. आपल्यासाठी सार्थक जे मोलाचे कार्य करते आहे, त्याचे भान बाळगून, आपली जबाबदारी ओळखून वागूया. सातत्याची जाणीव मनात ठेवून 'हम होंगे कामयाब' हा नारा देत आपले भविष्य घडवूया ! सर्व सार्थक सदस्यांना निरंतरतेचा वसा घेण्यासाठी आणि तो पूर्णत्वाला नेण्यासाठी शुभेच्छा !!



शेखर जोशी
सदस्य – कौशल्य वृद्धी आणि मेंटॉर

# ४ सातत्य- यशाची गुरुकिल्ली!

## मुलाखत- सीमंतिनी गोखले



अल्प परिचय:–

सीमंतिनी गोखले ह्या करिअर समुपदेशक, आहार तज्ञ व सार्थक मैत्रच्या मेंटोर, अशा सार्थकच्या अनेक प्रकल्पात कार्यरत आहेत. सीमंतिनी गोखले यांनी Food & Nutrition या विषयात पदवी पर्यंतचे शिक्षण घेतले असून नंतर एम.एड. केले आहे. त्यांचा योग आणि आहार यात सखोल अभ्यास आहे. ज्ञान प्रबोधिनी मधून श्रीराम गीत सरांच्या मार्गदर्शनाखाली करिअर समुपदेशन शिकलेल्या आहेत. सार्थकच्या स्थापनेपासून आज पर्यंत ताई सार्थकच्या प्रत्येक प्रकल्पात सहभागी होऊन निरंतर योगदान देत आहेत.

१) तुमच्या मते ‘सातत्य म्हणजे काय? त्याचे महत्व तुमच्या दृष्टीने काय?

एखादी कृती काही काळपर्यंत न थांबवता, सलगपणे करत राहणे म्हणजे सातत्य. मग ते विचारातलं असेल किंवा कृतीतलं. कोणत्याही गोष्टीत consistency असणं.

‘सातत्य’ च्या जोडीने येते चिकाटी. सातत्य ठेवलं तर चिकाटी येते. चिकाटी असेल तर सातत्य राहतं. रोजच्या सध्या सोप्या भाषेत म्हणायचं झालं तर एखाद्या गोष्टीच वळण लागणं किंवा सवय लागणं.

अभ्यास, शिक्षण, कौशल्य किंवा त्यानंतरच करिअर सगळ्यात यश मिळवायला स्वभावातला सातत्य हा गुण हा पैलू नक्कीच मदत करतो.

२) सातत्याने एखादी गोष्ट केल्यास आयुष्य बदलते का? तुमच्या आयुष्यातील एखादा अनुभव.

खरं तर दैनदिन आयुष्यात आपण सगळेच नकळत अनेक गोष्टी सातत्य असल्यामुळे किंवा सातत्य ठेवूनच करत असतो. यश मिळवण्यासाठी सातत्य असायला हवं हे खर पण ते योग्य वेळी असायला हवं, हे ही तितकाच महत्वाचं, जसं एक महिन्याने परीक्षा असेल तर तर त्याच्या आधीच अभ्यासातल सातत्य ठेवायला हवं.

मला माझ्या लहानपणचा अनुभव आठवतोय. मला गणित फारसं जमत नसे, गणिताची भिती होती. पण त्याला पर्याय नाही कळल्यावर रोज नियमितपणे एक दीड तास गणिताचा अभ्यास केला. हळूहळू गणित यायला लागलं. भिती कमी झाली.

३) तुम्ही सार्थकसोबत जी वाटचाल केली आहे, त्यामुळे तुमच्या आयुष्यात कोणते बदल झाले? विविध प्रकल्पातून तुम्ही कार्यरत राहिलात, त्याविषयी २–३ अनुभव / आठवणी सांगाल?

आपल्या आजूबाजूला अशी अनेक मुलंमुली असतात कि ज्यांच्यात अनेक क्षमता, कौशल्य आहेत पण कौटुंबिक, सामाजिक किंवा आर्थिक कारणांमुळे त्यांच शिक्षण थांबतं. अशांना योग्यवेळी थोडी मदत किंवा मार्गदर्शन मिळालं, तर या मुलांच्या क्षमता, कौशल्यांचा विकास होऊन ती स्वावलंबी होतात.हा मदतीचा हात देऊन त्यांना आत्मनिर्भर बनवणं हा ‘सार्थक’ चा हेतू मला अतिशय भावला. म्हणूनच सुरुवातीपासून मी स्वातीबरोबर, सार्थकबरोबर आहे. सार्थक’ च्या वेगवेगळ्या प्रकल्पात– १०वीच्या मुलांना अभ्यासविषयक, करिअरविषयक मार्गदर्शन तसंच वस्तीपातळीवरील महिलांना स्व–ओळख, आरोग्य– आहारविषयी माहिती देणं अशा प्रकल्पात मी सहभागी होते.

खर तर या प्रत्येक प्रकल्पात मला काहीतरी शिकायला मिळालं. समाजातल्या वेगवेगळ्या स्तरातलं सामाजिक जीवन, त्यांची कौटुंबिक रचना, एकमेकातले संबंध, मुलगे, मुली यांच्याविषयीचा दृष्टीकोन, त्यांच्या शिक्षणाविषयींचे विचार अशा अनेक गोष्टी प्रत्यक्ष बघयला, अनुभवायला मिळाल्या.




त्याबद्दलचे माझे अनेक गैरसमज दूर झाले. समोरच्या व्यक्तीचा ती जशी आहे तसा स्वीकार आणि संवेदनशीलतेने, तरीही वस्तुनिष्ठपणे विचार करता यायला लागला.

४) सार्थक आणि सातत्य यावर आपलं भाष्य—आपल्या मेंटीजना याविषयी काय मार्गदर्शन कराल?

या मुलांना स्वत:चे स्वप्न पूर्ण करायचे आहे. स्वत:चे ध्येय साध्य करायचय, सार्थक नेहमीच त्यांच्या पाठीशी असणारच आहे. एक गोष्ट नक्की की, एखादी गोष्ट कितीही कठीण असली तरी आवाक्यातील टप्प्याने, सातत्याने करत राहिल्यास आपण यशस्वी शकतो.

प्रत्येकात काहीना काही क्षमता, कौशल्य असतात. पण त्याच्या जोडीने 'सातत्य' नसेल तर यशही हुलकावणी देतं. सातात्याला सराव, चिकाटी,कौशल्य, नियमितपणा आणि वेळेचे नियोजन या सगळ्याची जोड दिली तर तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल.

५) 'सार्थक'च्या भविष्यातील वाटचालीत व यशात सातत्य किती महत्वाचे आहे?

'सार्थक'चं काम तर सतत चालूच राहणार आहे. पाच वर्षापूर्वीची आमची ही थोडीशी मागेमागे राहणारी, बुजरी, खाली इकडे—तिकडे बघत, नजर टाळून बोलणारी मुलं आठवतात. आणि आता तीच मुल आमच्याशी आपणहून बोलतात, समाजात आज खूप आत्मविश्वासाने वावरतात. स्वत:च्या ध्येयसाठी, स्वप्नासाठी खूप कष्ट करतात ते बघून खूप छान वाटतं.'सार्थक'च्या मदतीमुळे लॉ, सी ए., इंजिनीअरिंग सारख्या क्षेत्रात आत्मविश्वासाने पदार्पण करतायत.

हेच 'सार्थक'च्या सातत्याचे मोजमाप आहे नाही का?

शब्दांकन- शेखर जोशी.
ट्रेनर— कौशल्य विकास

Success isn't always about greatness.
It's about consistency.
Consistent hard work leads to
success.Greatness will come.

**Dwayne Johnson**

# ५ मुलगी शिकावी म्हणून- प्रोजेक्ट विद्या!

SARTHAK WELFARE FOUNDATION



एक मुलगी शिकली की दोन कुटुंबाना पुढे नेते. आधुनिक काळातील बदलांप्रमाणे शहरातील समाजात स्त्री–पुरुष विषमता हळूहळू कमी होताना दिसत असली तरीही ग्रामीण भागामध्ये अजूनही ही विषमता ठळकपणे जाणवते. तेथे मुलींना शिकवण्याकडे कल थोडा कमी असतो. साधारणपणे दहावीपर्यंतचे शिक्षण मुलींना मोफत असते, बरेचदा ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाची मजल तिथपर्यंतचीच असताना दिसते. परिस्थिती अगदीच बेताची असेल, तर मुलगी शिकणे यापेक्षा एक वेळची जेवणाची सोय (शाळेत मिळणारी खिचडी) हाच मुलींना शाळेत पाठवण्याचा मुख्य हेतू असतो. आणि बरेचदा दहावीनंतर या मुलींचे शिक्षण बंद झालेले दिसते. या परिस्थितीची जाणीव ठेवून सार्थक वेलफेअर फाउंडेशन आणि कल्याणी टेक्नो फोर्ज लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींसाठी सार्थक प्रोजेक्ट विद्या हा प्रकल्प २०१९ पासून सुरु करण्यात आला. २०१९, २०, २१ तीनही वर्षी मिळून साधारणपणे १५५ मुलींचे शैक्षणिक पालकत्व सार्थकने घेतले आहे.

## सार्थक विद्या २०१९

या प्रकल्पाच्या अगदी सुरुवातीपासून म्हणजे २०१९ पासून आम्ही या प्रकल्पाशी जोडले गेलेलो आहोत. मुलींच्या निवड प्रक्रियेमध्ये पुणे शहराच्या आजूबाजूच्या भागातील खेड्यात, गावात आम्ही पोहोचलो. तेथील हुशार, होतकरू, आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या या मुलींना, सार्थक विद्या स्कॉलरशिप मिळविण्यासाठी खालील टप्प्यातून जावे लागले.

मुलींचे १०वी तील गुण

आर्थिक परिस्थिती

मुलांच्या व पालकांच्या मुलाखती

गृहभेटी

मुलांचे अंतर्भूत कल आणि बलस्थाने यांचा परामर्श घेतला.

या वेगवेगळ्या टप्प्यांवर चाळणी लावत आम्ही २०२१मध्ये १०वी पास झालेल्या साठ मुलींची निवड केली. त्यांचे पदवीधर होण्यापर्यंतचे शैक्षणिक दत्तकत्त्व सार्थकने कल्याणी फोर्ज कंपनीच्या सहकार्याने घेतलेले आहे.

या मुलींना भेटून, वरील सर्व टप्प्यांचे अनुभव घेता घेता मला या चार ओळींचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो .

कोणी थोडी स्वप्न वेडी, कोणी कर्तव्यकठोर,<br>
कोणा आभाळाची ओढ,<br>
कुणा जमिनीचा घोर,<br>
कोणा जगण्याची धुंदी,<br>
तरी धुंदीतही भान,<br>
कोणी स्वत:मध्ये मग्न<br>
तरी ढळते न ध्यान....

असं म्हणतात की व्यक्ती तितक्या प्रकृती... या उक्तीप्रमाणेच आम्हाला या प्रक्रियेमध्ये विविध अनुभव आले. प्रत्येक मुलगी ही वेगळी होती, त्यांच्या घरातील लोकं वेगळी, त्यांची आर्थिक परिस्थिती वेगळी, सगळं काही वेगळं होतं...प्रत्येकीची स्वत:ची अशी एक वेगळी कहाणी होईल अशी त्यांची परिस्थिती होती. फक्त या सगळ्यांच्यात एकच समान गोष्ट होती ती म्हणजे परिस्थितीवर मात करून काहीतरी करून दाखवण्याची जिद्द.... पण या जिद्दीला आर्थिक पाठबळ नव्हते किंवा पाठीवर हात ठेऊन आम्ही तुझ्याबरोबर आहोत, तू लढ म्हणणारेही कोणी नव्हते. सार्थक विद्याची टीम या मुलींना खंबीर आधार देण्याचे महत्वाचे काम करीत आहे आणि त्यांना त्यांच्या ध्येयापर्यंत नेण्यासाठी मार्गदर्शन करीत आहे.

२०२१ मध्ये या सर्व मुली बारावी मध्ये चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाल्या आहेत, आणि नावाजलेल्या शिक्षण संस्थांमध्ये

त्यांच्या आवडीच्या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळवून उच्च शिक्षण घेत आहेत. सुरुवातीच्या काळात त्यांना छोट्या छोट्या गोष्टींमध्ये सुद्धा काळजीपूर्वक मार्गदर्शन करण्याची गरज भासली, पण आता मात्र या मुली थोड्या मोठ्या झालेल्या आहेत, त्यांना समज आलेली आहे.

१२वी तून उच्च शिक्षणासाठी वेगवेगळ्या संस्थांच्या परीक्षा देणे, तिथे ॲडमिशन मिळवणे हा काळ या मुलींसाठी स्थित्यंतराचा होता. प्रत्येकीचे शिक्षणाचे मार्ग वेगळे असल्यामुळे प्रत्येकीला ॲडमिशन संदर्भात वैयक्तिक मार्गदर्शन करणे गरजेचे होते. आमच्या करिअरच्या टीमने प्रत्येकाकडून plan A, आणि त्यात यश मिळाले नाही तर plan B असे पर्याय मुलींकडून घेतले होते. कधी कधी मुली एखादा कोर्स करायचा ठरवतात पण त्याच्या प्रवेश परीक्षेत त्यांना पुरेसे गुण मिळवता येत नाहीत, अशा वेळेला मुली निराश होतात आणि त्यांचे मनोबल वाढवणे गरजेचे असते अशा काही परिस्थितीत आमच्या मेंटॉर्सने त्या मुलींचे मनोधैर्य वाढविण्याचे महत्वाचे काम केले. त्यांच्या आवडीशी आणि क्षमतांशी सुसंगत इतर पर्यायांचा विचार करून तो निवडणे आणि त्यातील योग्य पर्याय मुलींना सुचवणे हे काम आमच्या करिअरच्या टीमने अतिशय उत्कृष्टपणे पार पाडले.

मुलींच्या ॲडमिशन झाल्या, प्रोफेशनल कोर्सेसला त्यांनी ॲडमिशन घेतल्या पण त्यांच्या शैक्षणिक गरजा वाढत असताना सार्थकच्या पुढे अनेक आव्हाने होती जसे की त्यांना असलेली लॅपटॉपची गरज किंवा त्यांना पुण्यात शिकायला आल्यावर राहण्यासाठी हॉस्टेलची सोय, तसेच काही मुली अगदी घरातल्या दोन कपड्यांवर पुण्यात शिकण्यासाठी आल्या होत्या त्यांना काही कपड्यांची सोय... अशा छोट्या–मोठ्या गोष्टींकडेसुद्धा सार्थक वेलफेअर फाउंडेशनने लक्ष देऊन, जिथे जिथे शक्य होईल तिथे मुलींना मदत करण्याचा परोपरीने प्रयत्न केला.

आमच्या डिप्लोमा शिकणाऱ्या मुलींनी तर प्रत्येक टर्ममध्ये उत्कृष्ठ मार्क्स मिळवून त्यांना मिळालेल्या या संधीचे सोने केले आहे.
या मुलींपैकी कोणी इंजीनियरिंग, कोणी लॉ, कोणी बी एस सी, कॉमर्स, कोणी फार्मसी अशा वेगवेगळ्या क्षेत्रात मुली शिक्षण घेत आहेत. आता या सर्वजणी प्रोफेशनल कोर्सेस शिकत असल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वेगवेगळी सत्रे सार्थकच्या माध्यमातून आयोजित करण्यात आली, जसे भावनांचे नियोजन, संवादकौशल्य. मुलींना त्यांच्या पुढच्या आयुष्यात लाभ मिळावा यासाठी अशा प्रकारचे अनेक सत्रे आयोजित केली गेली .

आम्ही फोनद्वारे, प्रत्यक्ष गृहभेटीच्या माध्यमातून, तसेच वेगवेगळ्या सत्रांच्या माध्यमातून या मुलींच्या सतत संपर्कात असतो. मुलींना नवनवीन विषयांवर मार्गदर्शन करता करता एक माणूस म्हणून आम्हीसुद्धा प्रगल्भ होत चाललो आहोत. नवीन, चांगले–वाईट अनुभव आमच्या गाठीशी आलेले आहेत... या प्रकल्पाच्या निमित्ताने मुलींमध्ये आणि आमच्या मध्ये एक मायेचे आपुलकीचे नाते निर्माण झाले आहे. गावच्या जत्रेलासुद्धा या मुली आम्हाला आवर्जून बोलावतात, जेव्हा आम्ही त्यांच्या घरी भेटीसाठी जातो तेव्हा, आम्ही तिथे पोचायच्या आधीच संपूर्ण कुटुंब आमच्या आदरातिथ्यासाठी तयार असते... या मुलींना घडवताना कधी ओरडावे लागते, कधी समजावून सांगावे लागते, कधी मायेची फुंकर घालावी लागते, कधी त्यांच्या विचारांना योग्य दिशा द्यावी लागते. आता या मुली अजून दोन वर्ष आमच्या बरोबर असणार आहेत. त्यांना त्यांची स्वप्न पूर्ण करण्याच्या वाटचालीमध्ये आमची संपूर्ण सार्थक विद्या टीम आवश्यक ते प्रयत्न सातत्याने करेल. याची मला खात्री आहे .
हा 'विद्या प्रकल्प,२०१९' यशस्वी करण्यासाठी आमच्या टीममधील डायरेक्टर स्वाती नामजोशी, सीईओ मृणाल राजहंस, अंजली पिटके, संग्राम मदने, शेफाली फालक, करुणा मोरे, मंजिरी टकले, अनघा हणमसागर या प्रत्येकाचा मोलाचा वाटा आहे.





सार्थक विद्या अंतर्गत घेतल्या गेलेल्या तिसऱ्या वर्षाच्या मुली या साधारण २०२१च्या डिसेंबर महिन्यात कल्याणी टेक्नो फोर्ज कंपनीकडून आमच्या हाती सुपूर्त करण्यात आल्या तोपर्यंत ते शैक्षणिक वर्ष अर्ध्याहून अधिक वर्ष निघून गेलेलं होतं. ११वीचा डिसेंबर महिना उगवलेला होता आणि त्यात मुलींची निवड प्रक्रियेत मुलींची आणि आमची भेट न झाल्यामुळे सार्थकच्या मेंटॉर पुढे त्यांच्याशी connect होणे हे एक आव्हान होते, कारण या मुली पुण्यापासून लांब राहत असल्यामुळे फोनद्वारे संपर्क करणे हेच एकमेव माध्यम आता आम्हाला उपलब्ध होते. या मुलींना सातत्याने फोन करून, त्यांच्याशी ओळख करून घेणे, त्यांच्याशी हळूहळू जवळीक वाढवणे, त्यांच्या घरातली परिस्थितीचा आढावा घेणे..., मुलींची विचार प्रक्रिया समजून घेणे, त्यांची आवड–निवड, मुलींचा स्वभाव कसा आहे याचा अंदाज बांधणे हे गरजेचे होते. त्यात आम्ही अनोळखी असल्यामुळे काही मुली बोलायला बुजायच्या, त्यांच्या मानसिकतेचा विचार करून, त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करून त्यांना बोलतं करणे ही पहिली महत्त्वाची पायरी होती. आमच्याकडे ह्या वेळेला तीन विभागातल्या मुली होत्या त्या म्हणजे रांजणगाव, बारामती आणि राजस्थान.

या मुलींशी नीट ओळख होण्यात एक महिना निघून गेला, आणि हातात शैक्षणिक वर्षातला वेळ कमी असल्यामुळे त्यांच्यासाठी आयोजित केलेली सत्रसुद्धा आम्ही लगेचच सुरू केली आणि त्या ऑनलाईन सत्रात, व्हिडिओकॉलच्या माध्यमातून आम्हाला या मुलींची अधिक चांगल्या प्रकारे ओळख होत गेली.

टेलिफोनद्वारे केलेले समुपदेशन आणि सत्राच्या माध्यमातून घडलेला संवाद यातून आता मुलीसुद्धा आम्हाला चांगल्या प्रकारे ओळखायला लागल्या. त्यांच्या बोलण्यातला कावरेबावरेपणा आता कमी झालेला होता.... आपल्याला कितीही घाई असली तरी त्या त्या गोष्टींना तो तो वेळ द्यावाच लागतो.... बघता बघता मुलींच्या अकरावीची परीक्षा झाली आणि आता मुली बारावीत जाणार आहे हे लक्षात घेऊन मुलींची परीक्षा झाल्या झाल्या त्यांची कल चाचणी घेण्याचे ठरवले. त्यांचा करिअरसाठीचा कल कोणता आहे, त्यांच्या क्षमता काय आहे, त्यांची बलस्थानं कुठली आहेत हे ओळखून त्यांना करिअर ऑप्शन्ससाठी मार्गदर्शन करण्याचे सार्थकने ठरविले होते. व्हाट्सअपच्या माध्यमातून एक गट प्रस्थापित करून त्यांच्या ऑनलाइन टेस्ट घेऊन त्यांना करिअर गायडन्सचे सत्र हे ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले, त्यात त्यांना विविध करिअरच्या पर्यायांची माहिती देण्यात आली तसेच प्रत्येकासाठी वैयक्तिक करिअर मार्गदर्शन समुपदेशन सुद्धा करण्यात आले. त्यासाठी मुली आपल्या नजरेसमोर असाव्यात आणि त्यांचे प्रतिसाद, त्यांची बोलण्याची ढब, त्यांची देहबोली हे सगळे समजून घेण्यासाठी व्हिडिओ कॉल च्या माध्यमातून हे समुपदेशन सत्र घेण्यात आले.

रांजणगावमधील खूप मुली या दुर्गम भागात राहणाऱ्या आहेत आणि त्यामुळे त्यांना कॉलेजला जाण्यासाठीसुद्धा आठ–दहा किलोमीटर लांब जावे लागते. येण्या जाण्यासाठी बसची किंवा इतर काहीही सोय नाही आणि अशा परिस्थितीत मुली कॉलेजला कशा जात असतील... अशात त्यांना क्लास लावणे हे आर्थिक परिस्थितीमुळे आणि त्यांच्या जवळपास क्लास नसल्यामुळे हे शक्य नव्हते. त्या वेळेला त्यांना ऑनलाईन मार्गदर्शनाचा लाभ मिळावा, यासाठी ज्या मुलींची मोबाईल फोन्स विकत घेण्याची परिस्थिती नव्हती, त्या मुलींना कल्याणी टेक्नोफोर्ज कडून मोबाईल फोन देण्यात आले. त्यामुळे ह्या मुली आता कल्याणी कंपनीच्या आणि सार्थकच्या सत्राला हजर राहू शकतात. कल्याणी टेक्नोफोर्जच्या माध्यमातून मिळालेले फीचे पैसे आणि सार्थक वेलफेअर फाउंडेशनच्या माध्यमातून मिळालेले मार्गदर्शन आणि पाठिंबा यामुळे या वर्षी आता मुली शिक्षणाच्या बाबतीत मानसिक आणि आर्थिक दृष्ट्या चिंतामुक्त झालेल्या जाणवतात.

आता या मुली बारावीत गेलेल्या आहेत आता सगळं रुटीन व्यवस्थित सेट झालेले आहे. यावर्षी क्लास लावणे काही मुलींना शक्य नसल्यामुळे सार्थकच्या माध्यमातून त्यांना अभ्यासाबद्दलचे मार्गदर्शन देण्यात येणार आहे, तसेच अभ्यास कौशल्य आणि १२वी नंतरच्या ॲडमिशन प्रोसेससाठीची सत्र आम्ही या वर्षात या मुलींसाठी घेणार आहोत.

राजस्थानच्या मुली– तसं म्हणायला गेलं तर शिक्षण आणि त्यात मुलींचे शिक्षण याला आता महत्व मिळायला लागले आहे. जगाच्या पाठीवर कोठेही जा ती जागरुकता आता यायला लागली आहे. याचेच एक प्रगतीशील पाऊल म्हणजे कल्याणी परीवारातर्फे राजस्थानमधील भिवडी येथील ५ मुलींचा विद्या प्रकल्पात झालेला समावेश.

२०२२च्या सुरुवातीला या मुली मेंटी म्हणून आमच्याकडे आल्या आणि आमचा पहिला फोन झाला तो या मुलींना स्कॉलरशिप मिळाल्याचा! खूप छान बातमी मला या मुलींना द्यायची होती. त्यातील काही जणींना बोलण्याची संधी द्यायची होती. फोन करायचा म्हणजे आम्हाला राष्ट्रभाषेचा वापर करणे आवश्यक होते. फोन केले तर या मुलींशी मला बोलताच येत नव्हते आणि ट्रॅक्टरचा मला मोठा आवाज. फोन वडिलांकडे. ते कामाला निघालेले. दुसरा नंबर विचारला तर तो पाठ नाही. शेवटी पालकांकडे निरोप दिले व ३ मुलींच्या पालकांना मुलींनी बोलावे असे सांगितले. पण पालकांचे सहकार्य छान मिळाले. लगेच प्रत्येक पालकाने मुलींपर्यंत निरोप पोहोचवला आणि मुली कार्यक्रमाला पोहोचल्या. या कार्यक्रमाची लिंक मला देण्यात आली होती. या मुलींना मी ऑनलाईनच भेटले. पुढचे दोन दिवस मजेशीर होते कारण एकमेकांची भाषा समजून घेत असताना मजा येत होती. हळूहळू भाषेतील accents समजून घेत आमचे बोलणे सुरू झाले. एक छान अनुभव येथे बोलताना येत होता तो म्हणजे प्रत्येक वेळेस मुलींशी बोलत असताना आधी पालकांशी बोलणे होत होते. त्यांच्या मुलींच्या शिक्षणासंदर्भात, मानसिक आरोग्यासंदर्भात कोणीतरी लांबून मार्गदर्शन करते आहे ही गोष्ट पालकांना सुखावत होती. संपर्कासाठी अडचण सततच येत होती. त्यातच या सर्व मुली आर्ट्समधे शिकणाऱ्या. माफक फी. मग यांना फोन दिले गेले. RSCIT चा क्लासही लावण्यात आला. मधे एक ऑनलाईन सेशन घेण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी झाला. मग फोन मिळाल्यावर प्रत्येकीला फोन करून गूगल मिट कशी जॉईन करायची हे सांगितले. या सर्व प्रोसेसमधे राजस्थान येथील अंकित सरांनी खूप मदत केली. आता मुलींशी खूपच छान रॅपोर्ट तयार झाला आहे.

या सर्व प्रवासात मी हिंदी बोलू शकत असले तरी त्यांचा accent व बोली भाषेतील शब्द समजून घ्यायला मला वेळ लागत होता. एखादा शब्द मला कळाला नाही तर तो समजून घेईपर्यंत वेगवेगळ्या अर्थांची वाक्ये बोलावी लागत होती. मॅडमजी ऐसा नाही, वैसा नहीं असे बोलणे व्हायचे. पण आता कहाणी सुफळ संपूर्ण झाली आहे. मुलींचे व पालकांचे आपणहून येणारे फोन, मेसेजेस यातून त्यांच्यापर्यंत मी जो विश्वास पोहोचवू शकले. त्यातून मॅडमजी जो आप बोलोगे वैसा हम करेंगे यातून जबाबदारी वाढल्याची जाणीव झाली. या मुलींचे लाईफ स्किलचे सेशन हिंदीमधून घेतले. पहिला रॅपो बिल्डिंगचा सेशन झाल्यावर मॅडमजी आप कितनी सारी जानकारी रखते हो, हम राजस्थान के हैं, लेकिन हमको भी पता नहीं है ऐसी बातें आपने हमें बतायी है, बहोत अच्छा लगा, ही बोलकी प्रतिक्रिया मलासुद्धा नवीन गोष्टी शिकायला भाग पाडते. सेल्फ डेव्हलपमेंट या संदर्भात सेशन झाले तेव्हा सेल्फ लव्ह या विषयावर बोलले. या मुलींची आई, बहिण, भाऊ सेशनला बसलेले असतात. या सेशननंतर मॅडमनी जो आप बोल रहे हो वो विचार हमने आज तक किया नहीं है, लेकीन खुद को इस तरह से जाननेकी हम कोशिश करेंगे और वैसा बदलाव करने की कोशिश करेंगे, ही सेशनची पालकांकडून मिळालेली दाद विषय त्यांच्यापर्यंत पोहोचल्याची दादच आहे. आताही जवळपास दोन महिने झाले, मुलींचे सेशन झाले नाही. सतत मॅडमजी अब दोन घंटे कब मिलना है, कुछ नया सिखेंगे या गोष्टी आपले सेशन आवडतात हेच सांगतात. सतत आप हमारे घर कब आओगे, घरपर रहने आ जाईये यातून त्यांच्यामधे असलेले आदरातिथ्य समजते. पुणे ते भिवडी हा प्रवास असाच आनंदात नवनवीन प्रयोग करत आमच्या सर्वांच्या प्रगतीसाठी खूपच प्रेरणादायी होत आहे यात शंकाच नाही. Mentoring मी करत होतेच पण long distance mentoring करता यायला लागले ही माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे.

**अनघा हणमसागर । मंजिरी टकले**
समुपदेशक– सार्थक विद्या.

> Replace excuses with effort replace laziness with determination and everything else will fall into place

# ६ What do you want to be ...? During tough time?

SARTHAK
WELFARE FOUNDATION




## Tough times never last, tough people do...

असे इंग्रजीत म्हटले आहे.

कठीण काळात सातत्याने व न डगमगता केलेले प्रयत्न, हेच प्रोजेक्ट विद्या २०२० बॅचचे सार्थ वर्णन करता येईल.
सार्थक वेलफेअर फाउंडेशन आणि कल्याणी टेक्नोफोर्ज कंपनीच्या संयुक्त प्रयत्नातून चालू केलेले प्रोजेक्ट म्हणजे 'प्रोजेक्ट विद्या'.
पुण्याच्या आसपासच्या ग्रामीण भागांमधून इयत्ता १०वी झालेल्या, हुशार पण आर्थिक अडचणीत असलेल्या मुलींची निवड करून, त्यांना पुढील शिक्षणासाठी स्कॉलरशिप दिली जाते व त्यांचा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला जातो.

२०२० मध्ये रांजणगाव (२५ मुली) आणि खेड—चाकण (२३ मुली) विभागातून 'प्रोजेक्ट विद्या' मधे निवडलेल्या मुलींचे हे दुसरे वर्ष.
कोरोनाच्या भयंकर संकटामुळे सर्वांचीच आर्थिक गणिते कोलमडली होती. गावांमधील दुकाने, व्यवहार सर्वच मधे मधे बंद होत होते. कुटुंबांना मदतीची गरज होती. त्यावेळी खेड—चाकण आणि रांजणगाव ह्या दोन्ही विभागांमध्ये, प्रोजेक्ट मधल्या प्रत्येक मुलीच्या घरी 'धान्य कीट' वाटप केले गेले. ज्यामध्ये सर्व कुटूंबाला, साधारण २ महिने पुरेल इतका शिधा दिला गेला. त्यामुळे सर्व मुलींना आणि त्यांच्या कुटूंबाला खूप मोठा दिलासा मिळाला.

कोरोनामुळे लागलेल्या lockdown मध्ये सर्वांनाच आर्थिक चणचण भासू लागली. जवळपास सगळ्याच पालकांचे उत्पन्न थांबल्यासारखे झाले होते, त्यातच घराघरात कोरोना पेशंट्स वाढायला लागले. काही जणांना तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. भितीच्या वातावरणात, शेती, व्यवसाय बंद असताना, हा खर्च पेलणं खूपच अवघड जात होते. त्यावेळी प्रोजेक्टमधल्या अत्यंत गरजू मुलींना COVID Help म्हणून तातडीने पैसे पाठवले गेले. ज्यामुळे ह्या मुलींना, त्यांच्या कुटूंबाला, नातेवाईकांना हॉस्पिटलमध्ये योग्य उपचार घेता आले.

एक आनंदाची बातमी अशी की परिस्थिती कठीण असतांनाही आमच्या २ मुलींनी कोविड काळात गावात मदत केली, भरपूर काम केले व त्याकरिता त्यांना एक बक्षीस देखील मिळाले.
कोरोना महामारी संकटामुळे, सलग दुसऱ्या वर्षीही दिवाळी साजरी करता येणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत कल्याणी टेक्नोफोर्ज कंपनीने पुढाकार घेऊन, सर्व मुलींना, दिवाळीच्या दिवसांमध्ये, आनंद मिळवून दिला. प्रत्येक विभागातून, मुलींना किंवा त्यांच्या पालकांना कंपनीत येण्यासाठी बसची सोय उपलब्ध करून देण्यात आली.
कंपनीमध्ये एक छोटासा कार्यक्रम करून, प्रत्येकाला छान गिफ्ट देण्यात आले. बाहेरच्या निराशाजनक वातावरणात, हा कार्यक्रम सर्वांनाच मनाची उभारी देऊन गेला अशी प्रतिक्रिया अनेक मुलींनी आणि त्यांच्या पालकांनी दिली.

१२वीचे वर्ष किती महत्त्वाचे असते हे आपल्या सगळ्यांना ठाऊक आहे. पण या वर्षी ते महाकठीण झाले होते, कोविड

अडचणीमुळे.
मुली सुरवातीला ऑफलाईन मग नंतर ऑनलाईन, परत ऑफलाईन असे करत अभ्यास करत होत्या .

कॉलेज बंद, क्लास बंद त्यात आर्थिक अडचणी, यामुळे मुलींच्या अभ्यासावर परिणाम होतो आहे हे पाहून सार्थक फौंडेशनने त्यांचे ऑनलाईन अभ्यासाचे सेशन घ्यायचे ठरविले. त्यात मुलींना कशाची जास्त गरज आहे हे विचारून मगच मृणाल राजहंस व स्वाती नामजोशी यांनी पुढे जायचे ठरविले. त्यानुसार कॉमर्स व सायन्सचे सेशन रविवारी होत होते. त्यात त्यांना अभ्यासक्रम तर समजावला त्या बरोबर पेपर्स कसे लिहायचे ते पण शिकवण्यात आले. मुलींना शेवटी असे वाटले की इंग्लिशच्या सेशनची गरज आहे म्हणून ते सेशन घेण्यात आले .

त्याबरोबरच स्व ओळख, मानसिक स्थिती कोविड काळात कशी मजबूत ठेवायची हे सांगण्यासाठीचे सेशन ठेवले होते .एक महत्वाची गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे आमच्या काही मुली अत्यंत दुर्गम भागात राहतात, त्यांना कधीही क्लासला जाणे शक्य झाले नसते हे ओळखून त्यांना सायन्सचे ऑनलाईन क्लास लावून दिले, मुलींना त्याचा फायदा झाला हे वेगळे सांगायला नकोच .

Digital India आमच्या अतिदुर्गम भागात राहणाऱ्या मुलींपर्यंत खरोखरच पोचलाय.

कोविडमुळे मुली आमच्याकडे आल्या तेंव्हा त्यांनी आधीच ११वी ला ॲडमिशन घेतली होती. पण त्यांच्या मनात करिअरबद्दल शंका होत्या त्याचे निराकरण करण्यासाठी त्यांची Aptitude test घेण्यात आली. प्रत्येक मुलीचे करिअर कौंसेलिंग करण्यात आले. कॉमर्सला सध्याच्या काळात असंख्य संधी उपलब्ध आहेत, पण मुलींना ते माहीत नाही, हे लक्षात घेऊन कॉमर्सच्या सर्व मुलींचे counselling मृणाल राजहंस यांनी केले. म्हणून सायन्स व कॉमर्सच्या मुलींना पुढचे ऑपशन्स कळले, त्यामुळे निर्णय घ्यायला त्यांना मदत होणार आहे .

हा अहवाल लिहीत असतानाच मुलींचा १२ वीचा निकाल लागला. हे लिहायला अत्यंत आनंद होतो आहे की मुलींनी उत्तम यश मिळवले आहे. त्यांच्या ॲडमिशन होणे अजून बाकी आहे. आमच्या डिप्लोमा करणाऱ्या मुलीही चांगले मार्क्स मिळवून पुढे जात आहेत .

यश हे यशच असतं, पण यशाच्या मागेही वेगवेगळ्या कहाण्या असतात. आमच्या प्रत्येक मुलीचा लढा वेगळा आहे. मात्र ध्येय एक आहे. आपण नेहेमीच असे म्हणतो की जगाचे सगळं आहेरे आणि नाहीं रे असे दोन भाग पडतात, मात्र लढणार आहे रे आणि लढणार नाहीं रे असे दोन भाग असतात हे आमच्या मुलींनी दाखवून दिले आहे.

Whatever life throws at you ] even if it hurts you, just be strong and fight through it - Strong walls shake but never collapse- हे आमच्या मुली सिद्ध करत आहेत .

मुलींचा हा प्रवास यशदायी करण्यासाठी आम्हाला मृणाल राजहंस व स्वाती नामजोशी यांचे मार्गदर्शन, त्याचबरोबर संग्राम मदने, अंजली पिटके यांचे सहकार्य मिळाले आहे.

मेघाली राजे. । मनाली उमराणीकर
समुपदेशक– प्रोजेक्ट विद्या

***Small consistent efforts can bring massive changes.***

# ७ सातत्य- चिकाटी व प्रयत्नांचे

## मुलाखत- मंजिरी टकले

SARTHAK WELFARE FOUNDATION



सातत्य म्हणजे काय ? त्याचे महत्त्व तुमच्या दृष्टीने काय ?

सातत्य एक प्रचंड जादूभरा प्रचंड ताकदीचा अशक्य गोष्टी शक्य करणारा शब्द. इंग्रजीमध्ये बघायला गेलो तर 'कन्सिस्टन्सी.' योग्य दिशेने पावले उचलली तर जेमतेम बुद्धीने असणारी पण ठरवलेली ध्येय साध्य करू शकतात. प्रचंड यश आणि सन्मान मिळवू शकतात. हार न मानता चिकाटीने सातत्याने काम करत राहिलो तर माणसातील आत्मविश्वास वाढतो. याचा स्व विकासात खूप मोठा हातभार लागतो. हे सातत्य राखत असताना वेळेला खूप महत्त्व असते. भारतरत्न, पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, खेलरत्न, अर्जुन पुरस्कार, नोबेल पुरस्कार विजेते, विविध शोध लावणारे शास्त्रज्ञ इत्यादी आज जे यश मिळवतात ते सातत्याच्या जोरावर! अगदी लहानात लहान यश मिळविताना सुद्धा प्रयत्नात सातत्य असावे लागते. छोट्या छोट्या गोष्टींमधून मोठ्या यशापर्यंत पोहोचतानासुद्धा सातत्य, ध्येय, उदिष्ट लागते त्यातूनच प्रयत्नांची पराकाष्ठा यशश्री खेचून आणली जाते.

सातत्याने एखादी गोष्ट केल्यास आयुष्य बदलते का? रियल लाईफ स्टोरी.

नक्कीच. कोणतीही गोष्ट करताना ध्येय समोर ठेवून चालले तर आयुष्य नक्कीच बदलते. आमच्याही आयुष्यात संघर्ष खूप आले पण यशाचे शिखर गाठायचे म्हटले तर प्रयत्न करावेच लागतात. त्यात किंचितही कसूर करून चालत नाही. जगाच्या पाठीवर कोठेही तसूभर स्वत:ची जागा नसलेले आम्ही दोघे नवीन घर घेतल्यावर त्याचा हप्ता मिळणाया पगारात कसा बसवायचा याचा विचार करत होतो. त्यासाठी केटरिंगचा व्यवसाय सुरू केला. पण आवश्यक ती गरज भागत नव्हती. विविध पर्याय समोर आले. शाळेची नोकरी सांभाळून काय करायचे याचा विचार करताना डायरेक्ट सेलिंगची संधी चालून आली. त्यातील उच्च स्थान मिळवायचे या ध्येयाने प्रेरित होऊन वेगवेगळ्या मिटींग अटेंड करणे, स्वत: शिकणे, लोकांना शिकवणे, वेगवेगळे टारगेट घेणे, त्यासाठी सतत करावे लागणारे ट्रॅव्हलिंग, लोकांची टार्गेट पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी घेतलेल्या छोट्या व मोठ्या मीटिंग, मानसिकता बदलवण्यासाठी केले जाणारे प्रयत्न, लोकांना बांधून ठेवण्यासाठी त्यांच्या स्वप्नांसाठी केले जाणारे काम आणि त्यातून केलेल्या वेगवेगळ्या अचिव्हमेंट्स, त्यात राखले गेलेले सातत्य हेच आमच्या यशाचे गमक. यात मेहनतीने आम्ही पैसा, मानमरातब मिळवला. परदेश वाऱ्या तर दोन पासपोर्ट पूर्ण भरून गेले इतक्या केल्या. २, ४, ६ , ८, १० सिटर विमानामधून भरपूर प्रवास केला. घरात सुख संपत्ती आली. त्यातही कधीकधी डाऊन फॉल होता, पण ध्येय पुर्ण करण्यासाठी स्वत:ला सतत प्रेरित ठेवणे, प्लॅनिंग करून त्याबरहुकूम त्याचा अवलंब केल्यामुळे आमचे आयुष्य बदलत गेले. त्यातूनच मग वेगवेगळ्या गोष्टी शिकण्याची आवड निर्माण झाली. व्यक्तिमत्त्वात बदल होत गेले. सकारात्मकता, ठामपणा आत्मविश्वास वाढत गेला. इतर व्यक्तींचे आयुष्य घडवण्यात आनंद वाटायला लागला. आवश्यक तेवढे कमावले आहे आता समाजासाठी काही केले पाहिजे ही भावना वाढीस लागली. गरजू व्यक्तींना मदतीचा हात देण्याचा हा विचार मनात येऊन त्याप्रमाणे अंमलबजावणी सुरू केली. कोणतेही संकट, कशीही परिस्थिती आली तर प्रयत्नांचे सातत्य हे हवेच. काळ व वेळेनुसार आपली स्वप्न व ध्येय बदलतात पण आमचे प्रत्येक स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही घेतलेली मेहनत त्यात होती. यात कोठेही पूर्णविराम नव्हता.एक स्वप्न पूर्ण झाले की दुसरे बघणे व ते पूर्ण कसे होईल यासाठी प्रयत्नांची सातत्याने साखळी गुंफत जाणे हेच आम्ही करत गेलो आणि आजही करत आहोत.

सार्थकसोबत वाटचाल करताना आयुष्यात कोणते बदल झाले? विविध प्रकल्पातील तुमचे अनुभव सांगा.

सोबत काम करताना खरं तर संस्थेच्या स्थापनेच्या आधीपासूनच कामाला सुरुवात झाली होती. वेगवेगळ्या शाळांना भेटी देणे तेथील मुख्याध्यापकांबरोबर चर्चा करणे, त्यांना आपले विचार समजावून सांगणे व त्या त्या शाळेत मुलांबरोबर काम करण्यासाठी होकार घेऊन येणे या गोष्टी करायला सुरुवात झाली. मग सगळ्यात मोठा बदल झाला तर तो म्हणजे मी परत मुलांना गोष्टी सांगायला लागले. त्यांच्यासोबत विषयानुरूप खेळ शोधणे, खेळ खेळून बघणे असे सुरू झाले. काही प्रयोग घरच्यांवरही केले गेले. त्यावर चर्चाही सुरू झाल्या. अशा गोष्टी करायला लागल्याने परत एकदा मुल बनले. मुलांना आवडेल अशा गोष्टींची तयारी करत असताना खूप वाचन केले. नवनवीन पुस्तके शोधणे, गुगल सर्च करणे थोडासा अभिनय, टाईम मॅनेजमेंटया गोष्टी कराव्या लागल्या कारण घरातील मुले ही घडवायची होती. त्यातच त्यांच्या परीक्षा, आजारपणे, घरात येणाऱ्या वेगवेगळ्या अडचणी याची ही कसरत करायची होती. जसे माझ्यात सकारात्मक बदल होत गेले तसे माझ्या मुलांमध्येही झाले. ध्येयाने प्रेरित होणे व त्यानुसार काम करणे याची सवय त्यामुळे मुलांनाही लागली.

वेगवेगळ्या प्रकल्पांची जबाबदारी घेत असताना लिडरशिप स्किल्स, कम्युनिकेशन स्किल्स, काऊन्सेलिंग स्किल्स वापरात आली. काही प्रकल्पांमध्ये विशिष्ट गटासाठी विशिष्ट वेळाचे काम असायचे. त्यानुसार वेळ ठरवणे, फोनवरून संपर्कात असणे. सहकाऱ्यांसाठी व सहकाऱ्यांकडून काम करून घेणे हे शिकायला मिळाले. यातही अंडरस्टॅंडिंग स्किल्स मोठ्या प्रमाणात वापरावी लागली.

तळेगाव येथील प्रकल्पात सलग तीन वर्षे काम केले तेव्हा मुले आपली वाट पाहतात हे खूपच जाणवले. शाळेच्या अभ्यासाव्यतिरिक्त नवीन शिकायला मिळते म्हणून मुलांचा असलेला उत्साह, त्यांच्याबरोबर डबा खाण्यासाठी केलेला आग्रह, समुपदेशन करताना मुलांना वाटणारा विश्वास, घरातील, अभ्यासातील अडचणी सोडविण्यासाठी मागितलेली मदत, कधी कधी पालकांचे करावे लागलेले समुपदेशन या सर्व गोष्टींमुळे जबाबदारी वाढत गेल्याची जाणीव व आत्मविश्वास वाढत गेला.

आय टी आय घ्या प्रकल्पात सकाळी लवकर निघणे ट्रॅफिकमधून उशिरा घरी पोहोचणे या गोष्टी सतत होत असत. पण मुलांसमोर जाताना तोच उत्साह कायम ठेवावा लागायचा.मुलांचे केलेले टेस्टिंग आणि वैयक्तिक समुपदेशन मुलांचा आत्मविश्वास वाढवून गेले. या प्रकल्पात सुरुवातीला या कोण? आम्हाला काय करायचे आहे ते ठरलेले आहे. या काय सांगणार असा सूर काहीवेळेस जाणवायचा. पण जेव्हा यांच्यातील क्षमता सांगू लागलो तेव्हा विचार बदललेले ही जाणवले.

आदरयुक्त भावनेने बघत असणारे मेंटीज आता आमच्याशी मनमोकळी बोलतात. कोणतीही अडचण आली तरी माझ्याकडून उत्तर मिळणार हा असलेला विश्वास घरातील सर्व अडचणी प्रश्न सांगत असताना मॅडम कडून कोणतीही गोष्ट इतरांना सांगितली जाणार नाही याची शाश्वती, घरच्यांपेक्षा सुद्धा जास्त तुम्ही विचार करता. आमच्या पुढे उभे असणारे प्रश्न आमच्या आधी तुमच्या मनात येतात व त्यावर सोल्युशन लगेच मिळते व प्रश्न पटकन सुटले जातात मिळणारी कमेंट खूपच बोलकी आहे.

सार्थक आणि सातत्य यावर आपले भाष्य? मेंटीजना काय मार्गदर्शन कराल?

सार्थकचे बाळ आता पाच वर्षाचे झाले आहे. सार्थक संस्था यशस्वी व सातत्याने प्रगतिपथावर नेण्यास स्वाती, मृणाल व संस्थेतील मुलांच्या प्रगतीबद्दल सातत्याने काम करणारे माझे सर्व सहकारी यांचा मोलाचा वाटा आहे. वेळोवेळी असणाऱ्या मिटींग्स, कोणताही कार्यक्रम उत्तम रीतीने पार पाडण्यासाठी एकमेकांवर दिली जाणारी जबाबदारी, त्यासाठीची तयारी प्रोत्साहन याचे महत्त्व खूपच आहे.यातूनच सार्थकचा मेंटॉरींग प्रकल्प हा दिवसेंदिवस पंख पसरवत आहे. सुरुवातीला वीस बावीस मेंटींज असणारी ही संस्था बघता बघता साधारण तीनशे पर्यंत पोहोचली आहेत. या सर्वांसाठी मी माझी स्वत:ची गोष्ट सांगेन. तसे पाहता मी स्वत: भाषेची विद्यार्थिनी आणि व्हायोलिन हे वाद्य वाजवणारी हरहुन्नरी कलाकार. गुरु–शिष्य परंपरेत शिक्षण घेतले. यामुळे गुरुचे स्थान काय असते, सातत्याने रियाजाचे महत्व, गुरुने सांगितलेले तंतोतंत कसे पार पाडायचे व मेंटॉरींग म्हणजे काय हे फार लहानपणापासून समजायला लागले. जिद्दीने अभ्यास करणे, रियाज करणे त्यासाठी तन–मन व मेहनत याची तयारी असणे. यातही मेहनतीचे खूप महत्त्व आहे. भरपूर रियाज करून गुरुकडून पंधरा दिवसांनी जेव्हा भेटायचे तेव्हा उत्तम स्वर लागला म्हणल्यावर गुरूच्या तोंडून निघालेला वाऽऽ, तो मिळवण्यासाठी केलेली प्रचंड मेहनत सातत्य. अजूनही तो कौतुकाचा स्वर कानात आहे. शारीरिक व्याधींमुळे हे करियर मी पूर्णत्वाकडे नेऊ शकले नाही .

एक मार्ग बंद झाला तर दुसरा उघडला. शिक्षकाची नोकरी सोडून समाज कार्य करायचे यासाठी नवीन शिक्षण घेणे आवश्यक होते. विचार करून कौन्सिलिंग हे क्षेत्र निवडले व वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षी नवीन शिक्षण घ्यायला सुरुवात केली. तेव्हा ही शारीरिक अडचणी आल्या. अगदी परीक्षेच्या वेळेस सुद्धा लो ब्लड प्रेशरचा खूप त्रास झाला. सकाळी दवाखान्यात जाऊन

सलाईन लावणे, अर्धी बाटली सलाईन झाल्यावर पेपर द्यायला जाणे. पेपर झाल्यावर परत उरलेले सलाईन लावून घेणे या गोष्टी चालू होत्या. अशातच उत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून कॉलेजतर्फे मिळालेले बक्षीस त्याची पावती होती. मानसशास्त्रीय समुपदेशन बरोबरच करिअर व मॅरेज समुपदेशन शिकले. एम एस ची डिग्री घेतली. वेगवेगळ्या केसेस यशस्वीपणे हाताळायला लागले. काही अपवाद वगळता प्रत्येक केसमध्ये नवीन शिकायला मिळाले. एखादी केस सोडवत असताना मी मधेच अडकले तर शिक्षकांना मदतीचा हातही मागितला. तेही आनंदाने मदत करायचे. नवीन गोष्टी स्वत शिकत गेले. स्वत:त सकारात्मक बदल करत गेले .चढ उतार प्रत्येकाच्या आयुष्यात येतच असतात पण उतारावर दु:ख चढावर आनंद, उत्साह फेस करायचेच असतात. आपल्या आयुष्यात येणाऱ्या अडचणी दु:ख ही त्यातून बाहेर पडल्यानंतर स्वत:ला व इतरांना सक्सेस स्टोरी म्हणून सांगायचे असतात. नवीन इतिहास घडवायचा असतो. जिद्द, कष्ट सकारात्मकता, ग्रोथ माईंग सेट, स्व ची जाणीव, ध्यानधारणा आपल्या जवळ असणारी वेगवेगळी कौशल्ये दुसऱ्याला द्यायचे असतात. त्यावर विचार करायचा असतो. बदल करायचा असतो व यशाचे शिखर गाठायचे असते. या अनुभवातून तुम्ही नक्कीच स्वत:ची सक्सेस स्टोरी सांगाल हा विश्वास वाटतो. असेही एक सांगावेसे वाटते की कोणत्याही वयात आपण आपले करिअर बदलू शकतो घडवू शकतो. प्रत्येकाने ते माझ्यासारखे बदलले पाहिजे असे नाही पण हा निर्णय घेतल्यानंतर झोकून देऊन काम करताना कधीतरी माझ्या मुलांचाही प्रश्न आला होता आई आम्हीपण लक्षात आहोत ना? पण आता या सगळ्या गोष्टींचा सकारात्मक परिणाम होताना दिसतो आहे. माझे सर्व कुटुंब माझ्यामागे उभे आहे. या सर्व पदपथावर मला सतत प्रेरणा देत असते. फक्त ध्येयाचा सातत्याने सातत्याने पाठपुरावा करणे महत्त्वाचे आहे.

सार्थकच्या भविष्यातील वाटचालीत व यशात सातत्य किती महत्त्वाचे आहे?

आपले अंतिम ध्येय गाठण्यासाठी छोट्या छोट्या टप्प्यांमधून पुढे जात राहणे, उद्दिष्ट पूर्ण करणे, प्रगतीत सातत्य राखणे हे आवश्यक आहे. कोणत्याही क्षेत्रात सातत्यपूर्ण कामगिरी महत्त्वपूर्ण आहे. आपल्या सर्वांना 'ससा कासवाची' गोष्ट माहिती आहेच. मी जिंकणारच असे गर्वाने म्हणणारा ससा मागे राहिला पण सातत्याच्या जोरावर कासवाने शर्यत यशस्वीपणे पूर्ण केली. सातत्य हा गुण वैयक्तिक आलेख व संस्थेचा आलेख उंचावण्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. आपण एखादी गोष्ट करू शकतो यावर विश्वास असेल तर कोणतीही गोष्ट असाध्य नाही. असाध्य गोष्ट साध्य केल्यानंतर पुन्हा त्या प्रकारचे यश मिळवण्यासाठी आपण धडपडतो व सातत्यपूर्ण प्रयत्नाने ते गाठतो सुद्धा. यावेळी '83' सिनेमा मधील एक वाक्य आठवते. TASTE THE SUCCESS ONCE, TONGUE WANTS MORE. हे अगदी सत्य आहे. एक संस्था म्हणून सार्थकच्या यशात सातत्य असणे अत्यंत जरुरीचे आहे. त्यासाठी ठरवलेले ध्येय कठीण असले तरी सातत्यपूर्ण प्रयत्नांना आपण हे ध्येय साध्य करू शकतो. योग्य तऱ्हेने काम करणे याला पण खूप प्राधान्य दिले पाहिजे. योग्य वेळेला योग्य गोष्टी केल्याने यश सातत्याने आपल्याकडेच येते. त्यासाठी skill enhancement करणे अनिवार्य आहे. सार्थक कडून त्याचे आयोजन वारंवार केले जाते. एखाद्या गोष्टीकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याने शिकण्याचा आनंद मिळू शकतो. सार्थकच्या कामात विचारात प्रयत्नात व दृष्टिकोनात हे सातत्य आहेच. So -------

Three cheers to Sarthak!!!

मुलाखत— मंजिरी टकले.— समुपदेशक— ट्रेनर

**शब्दांकन : शेखर जोशी.**

***Consistency is what transforms average into excellence.***

# ८ ग्रेट भेट!!




नमस्कार मंडळी!!

काल रोटरी डेक्कन जिमखाना क्लबच्या वतीने सार्थकच्या कामाची पुरस्कार देऊन दखल घेण्यात आली.कार्यक्रम अतिशय छान झाला. पण मला आज तुम्हाला वेगळंच सांगायचं आहे. त्या कार्यक्रमात रोटरीचे पदाधिकारी आणि इतरही अनेक मान्यवर उपस्थित होते पण सगळ्यात महत्त्वाची उपस्थिती होती ती म्हणजे BVG चे सर्वेसर्वा हणुमंतराव गायकवाड यांची!! कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षणच म्हणा ना!!

आपण म्हणतो ना की एखाद्याच्या दर्शनाने सुद्धा आपण धन्य होतो आणि त्यातच जर त्यांच्याशी संवाद साधायला मिळाला, त्यांचा जीवनप्रवास त्यांच्याच शब्दात ऐकायला मिळाला तर दूधात साखरच!!

खरं म्हणजे त्यांचा संपूर्ण प्रवास ऐकायचा तर संपूर्ण दिवसही कमी पडेल पण अगदी थोड्य वेळात त्यांनी आमच्यासमोर त्यांचा जो काही जीवनपट उलगडला त्याने तिथे बसलेली आम्ही सगळी मंडळी अक्षरश: भारावून गेलो आणि हे भारावलेपण इथून पुढे अनेक दिवस माझ्यासोबत असेल हे मी नक्की सांगू शकते.

त्यांचे बालपण, घरातील ओढग्रस्तीची आर्थिक परिस्थिती, वडिलांचा अकाली मृत्यू, आणि याही परिस्थितीत शिक्षण घेण्यासाठीची तळमळ, समाजासाठी काहीतरी करण्याची धडपड, सगळंच कल्पनेच्या पलीकडे!!

'केले म्हणजे होते' हे त्यांचे वाक्य खरोखरी मनाला भिडले आणि त्यांनी ते करून दाखवले. आज जे housekeeping चे काम ते करत आहेत ते आपल्या घरात करायला सुद्धा आपली मुले नाकडोळे मुरडतात.पण आज हेच काम BVG भारतभर आणि अनेक देशांमध्ये सुद्धा करत आहेत. आज ६०००० माणसे त्यांच्या सोबत आहेत. विमानतळे, मेट्रो, पंचतारांकित हॉटेल्स, संसद भवन, राष्ट्रपती भवन, पंतप्रधानांचे निवासस्थान, सुप्रीम कोर्ट या सगळ्या ठिकाणचे housekeeping आज BVG करत आहे. त्याच बरोबर विविध आयुर्वेदिक वनस्पतींचे संशोधन,अनेक दुर्धर आजारांवर आयुर्वेदिक औषधे,जनावरांच्या विविध आजारांवर रामबाण आयुर्वेदिक इलाज,पिकांवरील कीडनाशके, माती परीक्षण, पाणी परीक्षण याही क्षेत्रात आज त्यांनी बाजी मारली आहे. पुढच्याच महिन्यात त्यांचा IPO येतोय. यातच सगळे आले!!

आजच्या तरुण पिढीसमोर प्रेरणास्थान ठरावे असे त्यांचे अफाट कर्तृत्व आहे. आणि तरीही त्यांचे पाय जमिनीवर आहेत. करत असलेल्या कामाचा बडेजाव नाही, अहं नाही. अशी माणसे खरंच खूप अभावाने बघायला मिळतात. करोना काळात त्यांनी हजारो जीव वाचवले, त्यांना सर्व प्रकारची मदत केली आणि यासाठी त्यांनी तयार केलेली त्यांची टीमही तितकीच सशक्त आणि झोकून देऊन काम करणारी आहे यात वादच नाही.हे काम एकट्याने शक्यच नाही त्यासाठी एक भक्कम टीम आवश्यक आहे हे जरी खरे असले तरी एका लिडरचीही तितकीच आवश्यकता असते जो तुमचा दिशादर्शक असतो. १०८ नंबरची ambulance महाराष्ट्रात सुरू करून आज हजारो लोकांना त्यांनी जीवनदान दिले आहे.

असे कुठले क्षेत्र आहे ज्याच्यात त्यांचे योगदान नाही??केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे!! या उक्तीप्रमाणे त्यांचे अविरत काम सुरू आहे आणि इथून पुढेही ते तितक्याच गतीने सुरू राहील यात शंका नाही.

**मृणाल राजहंस**
सार्थक वेलफेअर फाउंडेशन
करिअर दिशा

# ९ इवलेसे रोपं- प्रोजेक्ट शिक्षाची यशस्वी वाटचाल.....

SARTHAK WELFARE FOUNDATION

अक्षरापासून शब्द बनतात, शब्दापासून वाक्य,
कोंबापासून नवे रोप, रोपापासून झाड,
बहरलेल्या झाडासारखं आयुष्य असं फुलावं,
वडाच्या पारंब्यांसारखे सर्वदूर पसरावं....

या कवितेनुसार आज सार्थक वेलफेअर फाउंडेशनची व्याप्ती वाढत आहे, Opus rural Foundation, आणि Sarthak welfare Foundation. यांच्या संयुक्त विद्यमानी अहमदनगर जिल्ह्यातील दक्षिण श्रीगोंदा परिसरातील पाच गावांमध्ये सार्थकने काम सुरु केले. कुटुंबातील आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या, हुशार अभ्यासू मुला–मुलींची निवड करून त्यांची पुढील पाच वर्षासाठी शैक्षणिक जबाबदारी घेण्यात आली.
संस्थेमध्ये सुरू असलेल्या इतर प्रोजेक्टप्रमाणे याही प्रोजेक्टने यशस्वीरित्या दोन वर्षे पूर्ण केली आहेत.
२०२१–२०२२ या शैक्षणिक वर्षात ३१ मुला–मुलींची निवड या प्रोजेक्टसाठी करण्यात आली. हे काम तसे सोपे नव्हते कारण वेगवेगळ्या गावांमधून मुला–मुलींची निवड करणे शाळेतील मुख्याध्यापकांना प्रत्यक्ष भेटणे, शिक्षकांशी बोलणे, स्कॉलरशिपसंदर्भातील फॉर्म देणे, यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती देणे, कलचाचणीसाठी सर्व व्यवस्था करणे, त्यांच्या मुलाखती घेणे, तसेच कुटुंबातील एकूण परिस्थितीचा अंदाज येण्यासाठी गृहभेट करणे खूप गरजेचे होते. या भागातील उत्पन्नाचे उदरनिर्वाहाचे साधन शेती असल्यामुळे आई–वडील दोघेही शेतात काम करतात. त्यांच्या वेळा पाहून गृहभेटीचे नियोजन करावे लागत होते परंतु सार्थकमधील टीमने सर्वांचे व्यवस्थित नियोजन करून गृहभेटी पूर्ण केल्या.
मुलांचा सर्वांगीण विकास कसा होईल या दृष्टीने सार्थक नेहमी प्रयत्न करत असते. यामध्ये मुला–मुलींसाठी महिन्यातून दोन्न असे सत्र घेतली जातात. यामध्ये मुला–मुलींच्या गरजा काय आहेत हे पाहून योग्य त्या गोष्टी मुला मुलींपर्यंत पोहोचविण्याचे काम केले जाते.

अभ्यास तर मुले करतात, पण तो लक्षात राहण्यासाठी अभ्यास कौशल्य, या मधून आपल्या वेळेचे नियोजन कसे करावे किंवा काही महत्वाचे मुद्दे लक्षात राहण्याची तंत्रे, अभ्यासाची जागा, इंग्रजी या विषयावर प्रभुत्त्व मिळवता यावे यासाठी स्पोकन इंग्लिशचे क्लासेसही सुरू करण्यात आले.
आहार, व्यायाम, प्रेरणा, त्याचबरोबर वाढत्या वयामध्ये होणाऱ्या बदलांना सामोरे कसे जावे, भावनांचे नियोजन कसे करावे, करिअर निवड कशी करावी. मित्र–मैत्रिणी व कुटुंबातील नातेसंबंध कसे सुदृढ ठेवता येतील, यासाठी ही काही सत्रांचे आयोजन केले. व्यक्तिमत्त्व विकासासाठी, जीवन कौशल्य आत्मसात होणे गरजेचे असते. जीवन कौशल्य, प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या मुलांपर्यंत पोहोचविण्याचे काम सार्थक वेल्फेअरची टिम करत असते. मुलांच्या गरजा लक्षात घेऊन मुलांसाठी शैक्षणिक साहित्य देण्यात आले.

'जगण्यासाठी जिद्द असावी, ध्येय असावे,
जगण्यासाठी वळण असावे यशाच्या मार्गांनी नेणारे '

या ओळी प्रमाणेच मुलामुलींना मार्ग दाखवण्यासाठी आम्ही तुमच्या सुखदु:खात सदैव तुमच्या बरोबर आहोत, यासाठी महिन्यातून दोनदा फोनच्या माध्यमातून संवाद साधला जातो. समुपदेशन केले जाते, यामध्ये समुपदेशक वेगवेगळ्या थेरपी वापरतो. case study, group counselling, group activity या माध्यमातून मुलांना बोलतं केल जातं.
ते आता त्यांना असणाऱ्या समस्या सांगतात. मनमोकळेपणाने बोलतात, हा सकारात्मक बदल मुलांमध्ये दिसून येत आहे. यावर्षी अकरावीमध्ये मुलांनी भरघोस यश संपादन केलेले आहे. हे त्यांचे यश पाहताना आनंद होतो. त्यांची टप्प्याटप्प्याने होत असलेली प्रगती मनाला समाधान देते.

**करुणा मोरे.**
समुपदेशक– प्रोजेक्ट शिक्षा

# १० मोगरा फुलला!- सार्थक मैत्र प्रकल्प




सार्थक वेलफेअर फौंडेशन'नी पाच वर्षापूर्वी समाजातील गरजू, हुशार व होतकरू मुलांना त्यांच्या शैक्षणिक उत्कर्षासाठी, त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहून सक्षम बनवण्यासाठी मदत करण्याचे ध्येय घेऊन ''मेटॉरिंग'' हा उपक्रम सुरु केला. १५ मुलांचे शैक्षणिक पालकत्व घेऊन या उपक्रमाला सुरुवात झाली.आज ३५० मुलांचे शैक्षणिक पालकत्व 'सार्थक'नी स्वीकारले आहे. पाच वर्षापूर्वी लावलेले हे रोप आता बहरू लागले आहे.

मुलांच्या बौद्धिक विकासाबरोबरच मानसिक, भावनिक विकासही महत्वाचा. यासाठी वेळोवेळी तज्ञांचे मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने वेगवेगळे सेशन घेतले गेले. याशिवाय एखादी सहल, इंडस्ट्रीयल व्हिजीट, कार्यशाळा इत्यादींचे आयोजन केले जाते. शाडूमातीचा गणपती बनवणे कार्यशाळा, बावणे पॉटरी स्टुडीओला भेट, लोहगड ट्रेक, एन डी ए व्हिजीट, उन्हाळी वर्कशॉप, कौशल्य विकास उपक्रम इत्यादी वेगवेगळे उपक्रम घेतले आहेत. कोविड काळात बाहेर जाणे शक्य नसल्याने मुलांसाठी निबंध स्पर्धा आयोजित केल्या. तसेच पुष्कर औरंगाबादकर यांचे वेळोवेळी सेशन आयोजित केले. कोविडनंतर बदललेली परिस्थिती, त्याचे सर्व क्षेत्रात जागतिक स्तरावर होणारे बदल आणि परिणाम, त्यातून उपलब्ध असलेल्या करिअरच्या संधी या सर्व मुद्द्यांवर मुलांबरोबर चर्चा करण्यात आली. यातूनच आपले योग्य करिअर निवडून तिथे पोहोचण्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत, प्रत्येक टप्प्यावर वेळेचे नियोजन या सर्वाचे उत्तम मार्गदर्शन त्यांनी त्यांच्या सेशनद्वारे केले.

कोविड काळात मुलांच्या बरोबर सतत संपर्कात राहून त्यांना अभ्यासात येणाऱ्या अडचणी बरोबरच, घरी शिधा पोहचवणे, औषधे पोहचवणे, कोणतीही मदत लागली तरी सार्थक टीम आणि मेटॉर यांनी तत्परतेने ती त्यांच्यापर्यत पोहचवली आहे.

कोविडच्या संकटावर मात करून सर्व मुलांनी आपल्या प्रगतीचा आलेख उंचावत नेला आहे. २०२१–२२ या वर्षात संकेत मैंदरकर मुबई येथे रुपारेल कॉलेज मध्ये Law चा प्रोफेसर म्हणून रुजू झाला. अंकिता जाधव हिची, इंजिनियरींग पूर्ण होतानाच दिल्लीला Adverb कंपनीमध्ये निवड झाली. संतोष पवार, मुकेश पेद्दे यांनी आपले डिप्लोमा पूर्ण करून पुण्यातील नामांकित कंपन्यामध्ये जॉईन झाले आहेत. सायली मानकर, अनिकेत जाधव यांनी आपले ग्रॅज्यूएशन पूर्ण करून MBA आणि बँकिंग क्षेत्रातील course जॉईन केले आहेत. रोहित चव्हाण आर्टिकलशिप करत CA फायनलची तयारी करत आहे. इतरही सर्व मुले कॉलेजच्या वेगवेगळ्या वर्षात शिकत आहेत आणि वेगवेगळे course करत आपले शिक्षण पूर्ण करत आपल्या ध्येयाकडे वाटचाल करत आहेत. अर्थातच या सर्व वाटचालीत सार्थकला आर्थिक पाठबळ देणारे डोनर्स आणि सदैव कार्यरत असणारी मेटॉर टीमचे सहकार्य या सर्वांचा मोलाचा वाटा आहे.

मुकेश पेद्दे याला अचानक समोर आलेल्या संकटामध्येही सार्थक टीमने धावून येऊन मदत केली. मुकेशचे वडील ICU मध्ये ॲडमिट होते, शिवाय बँकेचे हप्ते थकल्याने घरावर जप्ती येणार

होती, अशा दुहेरी संकटात तो सापडला होता. घरची आर्थिक परिस्थिती कोविडनंतर खूपच नाजूक होती. अशा परिस्थितीत सार्थकच्या संचालक स्वाती नामजोशी यांनी पुढाकार घेऊन सर्वांना मदतीचे आवाहन केले. त्याला सर्वांनी उत्तम प्रतिसाद दिला आणि घराची थकबाकी भरून बँकेकडून घराची कागदपत्रे ताब्यात घेण्यासाठी स्वतः मुकेशबरोबर बँकेत गेल्या. तर हॉस्पिटलमध्ये सतत संपर्कात राहून त्याच्या वडिलांच्या औषधोपचारसाठी सर्व मदत आणि मार्गदर्शन मृणाल राजहंस यांनी केली. या सर्व प्रसंगात मुकेश आणि त्याच्या कुटुंबीयांच्या बरोबर सतत संपर्कात राहून प्रसंगी हॉस्पिटलमध्ये, घरी जाऊन त्यांना आर्थिक मदतीबरोबरच धीर देण्याचे काम मुकेशच्या मेंटोर मंजिरी टकले आणि सार्थक टीमनेही केले.

मुलांना वेगवेगळ्या क्षेत्रात शिक्षणासाठी आवश्यक असणारी गरज म्हणजे कॉम्पुटर. ही गरज लक्षात घेऊन सार्थककडून मुलांना laptop देण्यात आले. कोविडनंतर मुलांसाठी गेट टुगेदर, दिवाळी सेलेब्रेशन असेही कार्यक्रम आयोजित केले. या मध्ये खेळ–मनोरंजन तसेच स्टेशनरी साहित्य वाटप आणि अल्पोपहार असा आनंद एकत्रितपणे साजरा केला. सार्थकनी लावलेले "मेटॉरिंग"चे हे रोप असेच वृद्धिंगत होण्यासाठी पुढील नियोजन सुरु केले आहे.

## सार्थक मैत्रची पुढील वाटचाल

शैक्षणिक वर्ष २०२२–२३ करिता सार्थक मैत्र साठी नवीन २५ विद्यार्थ्यांची निवड करण्याचे ठरवले आणि त्याच्या नियोजनाची सुरवात झाली. पदवी पूर्ण होईपर्यंत या मुलांची शैक्षणिक जबाबदारी स्विकारण्याचा 'सार्थक'चा मानस आहे.
दहावीचे १५ आणि बारावीचे १० विद्यार्थी आणि विद्यार्थिनीची निवड करण्यासाठी वस्तीपातळीच्या शाळा आणि कॉलेजेस मधून फॉर्म वाटप सुरु केले. त्याच प्रमाणे सार्थकमधील टीमनी सुचविलेल्या त्यांच्या घरकामवाली, ड्राइव्हर, भाजीवाले ह्यांच्या मुलांसाठी फॉर्म वाटप केले. उद्देश एकच हुशार, होतकरू विद्यार्थ्यांची निवड व्हावी. जवळ जवळ १०० ते १२५ फॉर्म सार्थककडे ह्या scholarship साठी आले. या विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी सार्थकने काही निकष ठरवले, जसे कि ८०% मार्क्स, वार्षिक उत्पन्न दीड लाखांहून कमी, खेळात विशेष प्राविण्य, अशा विद्यार्थ्यांची मुलाखतीसाठी निवड करण्यात येते. ही मुलाखत सार्थकमधील समुपदेशक आणि मेंटॉर्स यांच्याकडून घेण्यात येते. मुलाखतीच्या वेळी त्यांचे पालकही उपस्थित असतात. मुलाखतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांची aptitude टेस्ट घेतली जाते. Aptitude टेस्टच्या रिपोर्टवरून करिअर समुपदेशन केले जाते. विद्यार्थ्यांचे रिझल्ट लागले कि त्यांच्या होम व्हिजीट केल्या जातात. ह्या home visit करताना सार्थक मेंटॉर्सचा सहभाग असतो.

नवीन निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी मेंटॉर्सची देखील गरज असते हे ओळखून सार्थकने नवीन मेंटॉर्सची निवड सुरु केली. त्यातून सार्थकमध्ये नवीन आणि जुने असे ३० मेंटॉर्स जोडले गेले. ह्या मेंटॉर्ससाठी कार्यशाळा घेण्यात आली. ह्या कार्यशाळेत मेंटॉरींग म्हणजे नक्की काय? आपला रोल काय? टीनएज मुलांबरोबर संवाद साधताना काय महत्वाचे? त्यांचा मेंदू नक्की काय आणि कसा रीअॅक्ट करतो.... अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा अंतर्भाव ह्या कार्यशाळेत करण्यात आला. जेष्ठ सायकॉलॉजिस्ट, तज्ञ कौन्सेलर व सार्थकच्या मेंटॉर डॉक्टर शिरीषा साठे यांनी ही सेशन्स घेतली. डॉक्टरांनी टीनएज मुलांचं भावविश्व उलगडताना, आत्ताच्या परिस्थितीला सामोरे जाताना येणारे प्रश्न, त्यांना भुलवणाऱ्या निसरड्या वाटा आणि मोहमयी आणि गोंधळात टाकणारी परिस्थिती हे अतिशय सहजपणे समजावून सांगितले. ह्या कार्यशाळेमुळे मेंटॉर्स मुलाच्या पुढील मार्गदर्शनासाठी सज्ज झाले.

होम व्हिजीटनंतर निवड झालेल्या मुलांचा 'सार्थक मित्र' बरोबरचा प्रवास सुरु होतो. कॉलेज ॲडमिशनसाठी लागणारी मदत, त्यांची कॉलेज फी भरली जाते. ह्याच बरोबर मुलांना इतर educational support ची देखील आवश्यकता भासते. जसे, stationary, क्लास फी इत्यादी. ह्यासाठी देखील सार्थक विद्यार्थ्यांची मदत करते. त्याचबरोबर कौशल्य विकास आणि जीवन कौशल्य ह्यांची मुलांबरोबर वर्षभर सत्र घेतली जातात. ह्या सेशन्समध्ये मेंटॉर्सचा देखील सहभाग असतो. ह्या पूर्ण प्रवासात डोनर्सचे महत्व अनन्य साधारण असते. त्यांनी ज्या विश्वासाने सार्थकला आर्थिक पाठबळ दिलेले असते, तो विश्वास कायम राहावा ह्यासाठी सार्थक कायम प्रयत्नशील आहे.

सार्थक मैत्रच्या प्रवासात जोडले गेलेली मुले जेव्हा स्वतःच्या पायावर उभी राहतात तेव्हा वाटते.... ह्याचसाठी केला होता अट्टाहास!!!

**अंजली पिटके । संगीता सबनीस**
सार्थक मैत्र प्रकल्प समन्वयक




**शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले....हा योग फार क्वचित अनुभवायला मिळतो. मनातल्या प्रत्येक भाव भावना व्यक्त करता येतात अस नाही, म्हणूनच काही वेळा त्यांना  शब्दांचे पंख दिले कि त्याचे अर्थ होतात, वाचकाच्या मनाला स्पर्श करतात, समवेदेनेची अनुभूती देतात.**
**व्यक्त होणं हे त्याकरताच महत्वाचे!**

व्यक्त व्हा!
मानसिक स्वास्थ्याकरता देखील, परस्पर मनमोकळ्या संवादाला महत्त्व आहे. एकमेकांशी मोकळे बोला, दु:ख जाणून घ्या. आपण सर्वांगसुंदर नाही यात लाजण्यासारखे काहीही नाही. मोकळे व्हा. दुसऱ्यालाही जाणून घ्या आणि स्वत:चा, स्वत:च्या कमतरतेसहित स्वीकार करा, याकरता ही कविता!!

सांगा, खरच शक्य आहे
दुसऱ्यापाशी मोकळ होणं?
मनात साचलेल्या भावनांना
मोजक्या शब्दांत मांडता येणं?

मी हुशार, मी गंभीर
मी जबाबदार, मी खंबीर,
रीस्की असतं आपणच आपल्या
प्रतिमेला तडा देणं।
सांगा, खरच शक्य आहे?
दुसऱ्यापाशी मोकळं होणं?

मुलगा, नवरा, बाप, मित्र,
बॉस, कलिग, वेगळंच तंत्र
नात्यांमधल्या गुंत्यामधे,
स्वत:ला हरवून बसता,
कसं जमायचं पुन्हा एकदा
स्वत:चा शोध घेणं?
सांगा, खरच शक्य आहे
दुसऱ्यापाशी मोकळं होणं?

कोणीतरी काय म्हणेल?
म्हणून किती गोष्टी मनात ठेवतो,
मनातल्या महासंग्रामात,
धुमसत अशांत रहातो,
खूप असह्य होतं असत,
आतल्या आत पोळून जाणं,
सांगा, खरच शक्य आहे
दुसऱ्यापाशी मोकळं होणं?

आपल्या झालेल्या चुकांची
आपल्याला का वाटते लाज?
यशाप्रमाणे अपयशाचा
मिरवता येतो का साज?
दुख:,अपयश,अपमान निंदा,
तर देवालाही चुकले नाही,
पण, हलाहल पिऊन जगणारे,
आपण भोळे शंकर नाही!
आपल्या करता सत्य असतं
माणसांसारखच जगण!
सांगा, खरच शक्य आहे
दुसऱ्यापाशी मोकळं होणं?

बोलावसं वाटेल तेव्हा
मनमोकळं बोलून घ्यावं
चिंता, काळजी, अपमान, दु:ख
कोणाबरोबर वाटून घ्यावं,
उद्याच्या आनंदाकरतादेखील,
कालचं दु:ख विसरून जाणं,
निरोगी मनाकरता असावं,
मनपासून रीतं होण।
खरं सांगते, शक्य आहे
दुसऱ्यापाशी मोकळं होणं।।

कोणीतरी आपलं आहे
याचा शोध घेत जावं,
विश्वास ठेवायलासुद्धा
मन तेवढं सक्षम व्हावं,
सुदंर असतं परस्परांना
सावरताना धीर देणं,
समवेदनेने जमून जातं,
परक्यालाही आपलं करणं
खरं सांगते सोपं असतं
दुसऱ्यापाशी मोकळ होणं।।



# भाव भोळे ह्रदयीचे

१२

ह्रदयाची कवाडे मुक्त करुनी
एक गुपित उलगडते ।
स्वप्नांना मिळाले पंख
आनंद साजरा करते ।।धृ।।

जाहले होते उदास
मनी भविष्याची चिंता
अश्रु पुसण्या माता–पित्याचे
आळवु लागले अनंता ।।१।।

अकस्मात एक दिनी
पाहिले आपणा विद्यामंदीरी
मुलाखत माझी होणार म्हणुनी
मन श्रीगणेशास हाक मारी ।।२।।

सोपे कठिण प्रश्नातुनी
मुलाखत संपन्न झाली
निवड होता माझी
मी आकाशी उडी मारीली ।।३।।

कशी होऊ उतराई
अनंत आपुले उपकार
सर्वांनी पाठ फिरवीली
आपण दिला आधार ।।४।।

नसता आपण तर
कोमेजूनी गेले असते
ध्येयाकडे पाऊल कोवळे
धावत गेले नसते ।।५।।

अंधाराकडूनी प्रकाशाकडे
सुरु झाला प्रवास
आपणची पुरविली
ध्येयाची आस ।।६।।

खचलेल्या जीवाला
नवजीवन दिले
अडखळणाऱ्या पावलांना
क्षणोक्षणी आपण सावरले ।।७।।

योगा, प्रबलन, आरोग्य
सर्वांचे दिले ज्ञान
देवासारीखे आपण सारे
वाटतात मज महान ।।८।।

हि नव्हे स्तुती
सत्य बोल मनातले
ममतेने ओथंबलेले
भाव काळजातले ।।९।।

रोम रोम देहाचा
ध्येयासाठी झिजवेन
माता–पिता अन आपुले
नाव गगनी भिडवेन ।।१०।।

आपण सर्व गुरु
शिष्या मी तुमची
ध्येयाच्या पुर्तीसाठी
केली तयारी कष्टाची ।।११।।

एकची मागणे देवापाशी
कृपा असु द्यावी
सत्य असत्याची
ओळख पटवावी ।।१२।।

मुख आनंदी पित्याचे
जेव्हा मी पाहते
त्या आनंदाचे कारण
आपणासच समजते ।।१३।।

रात्रंदिन मनी
ध्येय हेची स्वप्न
अभ्यासात रहाते
सदैव मी मग्न ।।१४।।

सांगावे कसे आता
अमुल्य लाभले दान
मनोमन वाटते
आहे मी नशीबवान ।।१५।।

सकळ माझ्या सख्यांनो
घेऊयात कष्ट अपार
वेळेचा करुनी वापर
जीवनास देवु आकार ।।१६।।

लिहतानाही माझे
भरुनी येतात डोळे
सर्वांच्या ह्रदयी भरावे
आनंदाचे सोहळे ।।१७।।

धन्यवाद–
–गायत्री दिलीप सोनवणे.
प्रोजेक्ट विद्या, चाकण विभाग.

# १३ A New Girl In The City !!



नमस्कार... मी हर्षदा सयाजी कामठे. इयत्ता एफ.वाय. बीएससी. लेखाचे शीर्षक वाचून वेक अप सीडमधली नायिका आठवली असेल तर हरकत नाही! बारावीची बोर्ड एक्झाम न होताच आमचा रिझल्ट लागला.. कोरोनामुळे परिक्षा रद्द कराव्या लागल्या होत्या. दहावी आणि अकरावीच्या गुणांवर बारावीचे मार्क्स मिळाले आणि मी बारावी चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाले.

बारावी नंतर काय करायचं हे अगदी पक्कं होतं. "Look at the stars not your feets" या वाक्यानुसार ॲस्ट्रोफिजिक्सकडे विशेष ओढ वाटत होती. तसं फिजिक्स माझ्या जिव्हाळ्याचा विषय! म्हणून ठरवलं की सरकारी कॉलेजमधून सायन्सची डिग्री मिळवायची! त्यात IISER उत्तम, मग ठरलं IISER कॉलेजमधून डिग्री घ्यायची. अकरावी, बारावीमध्येही आयसरची प्रवेश परिक्षा दिली पण अनुत्तीर्ण! मग आयसर कॉलेज. त्यासाठी होणाऱ्या परिक्षा.. त्याचं स्वरूप. विचारले जाणारे प्रश्न आणि उत्तरे शोधण्यासाठी माझी धडपड! दरम्यान हा एकच प्लॅन ठेवून चालणार नव्हतं हे ही लक्षात आलेलं. जर आयसरला ॲडमिशन नाही झालं तर वर्ष वाया जाणार ! आणि गॅप घेऊन अभ्यास करण्यासाठी आयसरच्या पात्रतेबाहेर होतं. जे विद्यार्थी चालू शैक्षणिक वर्ष अकरावी, बारावी किंवा एफ वाय मध्ये आहेत केवळ अशांनाच ती परिक्षा देता येते असा नियम! मग गॅप घेऊनही मला फायदा नव्हता! घरी सगळ्यांनाच माझं कृषी क्षेत्राकडे जाणं अपेक्षित होतं ! कारण अकरावी, बारावी शारदानगरमध्ये एक कृषी विषय घेऊन झालेली. पण माझा प्लॅन बी कृषी नव्हता! जर ॲस्ट्रोफिजिक्स आयसरमधून करता आलं नाही तरीही सायन्स मधून पुढे शिकायचं हे पक्क होतं! कृषी क्षेत्रातील करिअरच्या संधी अफाट आहेत यात वाद नाहीच. पण मला जे शिकायचं आहे जे अनुभवायचं आहे, ते क्षेत्र कृषी नाही हे मला जाणवलं होतं! मला आवडेल, शिकण्यासाठी रूची वाटेल, माझ्या क्षमतांचा चौकटीबाहेर विकास होईल...आणि ते ॲस्ट्रोफिजिक्सच्या जवळपास जाणारं असावं असं क्षेत्र प्लॅन बी म्हणून निवडायचं ठरवलं! हा पूर्ण काळ खूप छान होता. नविन क्षेत्रांची माहिती मिळाली. केवळ इंजिनिअर आणि डॉक्टर या पलिकडे करिअरच्या अफाट संधी आहेत याचा प्रत्यय अनुभवला. सार्थक फाऊंडेशनतर्फे करिअर मार्गदर्शनचे सेशन झाले आणि धुसर दिसणाऱ्या कल्पना आकार घेऊ लागल्या. मला काय आवडतं ! मला काय करायचंय हे सारं ठरलं होतंच! फक्त त्याच्या जोडीला प्लॅन बी पण घ्यायचा होता... आणि तो ही ठरला Geology ! Zoology आणि Geology वेगळं.. हे मला 'तू काय शिकतेस' विचारल्यानंतर माझ्या तोंडून येणारं पहिलं वाक्य ! कारण Geology हा विषय बऱ्याच लोकांच्या परिचयाचा नाही! Geology म्हणजे पृथ्वीचा अभ्यास. दगडी घरांच्या बांधकामात वापरलेल्या खडकापासून ते रेडिओॲक्टिव्ह खडक पिचब्लेंडपर्यंतची सफर घडवणारा विषय ! केवळ खडकच नव्हे तर पृथ्वी का निर्माण झाली, कशी निर्माण झाली आणि कोणत्या घटकांपासून निर्माण झालीय इथपर्यंत सगळं..! Cosmo Geology हा ॲस्ट्रोफिजिक्सकडे नेणारा मार्ग! म्हणून प्लॅन बी ठरला Geology !

आता प्लॅन बी साठी कॉलेज चांगलं मिळणं गरजेचं होतं... पुन्हा कॉलेज निवडण्याची जबाबदारी घेतली! मी सासवडकर असल्याने जवळपास कॉलेज मिळावं अशी अपेक्षा होती! पुणे सासवडच्या जवळ.. आणि Geology साठी फर्ग्युसन कॉलेज पुणे उत्तम असंही समजलं! शिवाय सायन्समधून शिकायला मिळणार, वर्षही वाया जाणार नाही आणि आयसरच्या प्रवेश परिक्षेची तयारीही होईल या निकषांवर Geology विषय घेण्याचं पक्क ठरलं! सुदैवाने फर्ग्युसन कॉलेजमध्ये दुसऱ्या यादीमध्ये नाव लागलं, आणि माझं ॲडमिशन झालं!!!

पण गोष्ट इथे संपली नाही... इथून सुरू झाली! कोरोनाचे संकट आटोक्यात आले आणि महिनाभर ऑनलाईन सुरू असणारं कॉलेज ऑफलाईन सुरू करण्याचा निर्णय झाला. मी फार उत्साहात होते. जवळपास दिड, दोन वर्षांनंतर पुन्हा ऑफलाईन शिकायला मिळणार! या Pandemic मध्ये ऑनलाईन, ऑफलाईन हे शब्द जास्तच प्रभावशाली झाले आहेत नाही का? असो. तर मी उत्साहाने ऑफलाईन कॉलेजसाठी तयारी करत होते... नविन वह्या, पुस्तकं, बारावीची पुस्तकं.. ज्यातून काही कन्सेप्ट अडली तर समजून घेता येईल, रेफरन्स बुक्स, आयसर च्या प्रवेश परिक्षेची पुस्तकं सगळं वर काढून ठेवलं! तुर्तास कॉलेज हॉस्टेलची यादी जाहीर झाली नव्हती. त्यामुळे सासवड ते डेक्कन प्रवास बसने करावा लागणार होता! बसने या आधी कधी एकटीने प्रवास केला नव्हता. पण बस प्रवासाची माझी तयारी होती. नविन विषय, कॉलेज खुणावत होतं. पाहिलेलं स्वप्न साकार होत होतं. हा प्लॅन बी आहे हे पक्कं माहित होतं. तरीही फर्ग्युसन कॉलेज मिळालं याचा आनंद काही औरच होता! आयसर मिळवण्यासाठी स्टेपिंग स्टोन म्हणून मी फर्ग्युसन कॉलेजकडे पाहत होते! कारण आयसर परिक्षेचा अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी इथे शिक्षकांकडून सोडवता येणार होत्या!

अखेर कॉलेजला जाण्याचा दिवस उजाडला. लिहिलेल्या पाटीवरून बस कुठे जाते याखेरीज बाकी काहीच माहित नव्हतं. कॉलेजची वेळ दुपारी दोन ते साडे पाच ! पहिल्या दिवशी दुपारी बारा वाजता निघालो. माझे बाबा माझ्यासोबत आले होते. मला बसची माहिती देत कॉलेजपर्यंतचा रस्ता दाखवला.. माझं कॉलेज संपेपर्यंत ते बाहेरच बसलेले आणि कॉलेज सुटल्यानंतर पुन्हा घरी येण्यासाठीच्या बस दाखवल्या आणि मग आम्ही घरी पोचलो! त्या पुर्ण प्रवासात मी बसचे नंबर, नाव, मार्ग आठवत राहिले. हडपसर– सासवड बसमधली ती गर्दी नकोशी वाटत होती. बसमधले नविन अनोळखी चेहरे पाहून विचित्र वाटलं. रात्रीचे साडे आठ वाजले होते आम्ही घरी पोचलो तेव्हा. दिवसभराच्या दगदगीनंतर घरी आल्यावर जो रिलिफ मिळतो ना. तो काही वेगळाच असतो! त्या दिवशी कळालं, माझं घर कंफर्ट झोन बनलेला माझ्यासाठी. त्यामुळे बाहेर पडल्यावर सैरभैर वाटलं ! नविन, अनोळखी चेहरे विचित्र वाटले !

त्यानंतर दुसऱ्या दिवशी आई सोबत आलेली. तिलाही बसबद्दल फारशी माहिती नाही पण ती मी व्यवस्थित जातेयना यासाठी माझ्यासोबत आलेली. मी अगदी व्यवस्थित बसने कॉलेजपर्यंत पोचले. कॉलेज संपेपर्यंत आई बाहेर बसलेली, आणि त्यानंतर हडपसर बसने न जाता कात्रजमार्गे सासवडला पोहचलो. बसायला जागा मिळाली होती यातच मी खुश होते! मी एकटी जाऊ शकते याची आईला खात्री पटली आणि त्यानंतर काही आठवडे माझा एकटीचा बस प्रवास सुरू झाला. रोज काहीतरी वेगळा अनुभव यायचा. दरम्यान आमचं कॉलेज दहा ते साडे पाच सुरू झालं होतं. दहा ते एक प्रॅक्टिकल आणि मग लेक्चर्स. एकदा हडपसरवरून डेक्कनला जाणारी बस लवकर मिळेना म्हणून तिथल्या काकांकडे चौकशी करून कोथरूड डेपोच्या बसमध्ये चढले. डेक्कन कॉर्नरला उतरायला हवं लक्षात आलंच नाही. आणि बस पुढे जात राहिली. रस्ता अनोळखी वाटला तेव्हा लक्षात आलं आपण चुकलो! त्यात फिजिक्स प्रॅक्टिकल होतं. मग लगेचच पुढच्या स्टॉप वर उतरले आणि रिक्षाने कॉलेजमध्ये पोचले. बस चुकली की अगदी वैतागून जायचे. प्रॅक्टिकलला उशीर झाला की प्रोफेसर ओरडायचे आणि पुर्ण दिवस खराब वाटायचा! बस चुकण्याची ही पहिली घटना...

त्यानंतर एकदा साडे पाचला कॉलेज संपल्यानंतर बालगंधर्वला बससाठी थांबले होते. पाऊस पडून गेलेला. साडे सहा झाले तरीही कात्रज बस येईना. म्हणून स्वारगेट बसने स्वारगेटला पोचले. तिथून सासवड बस आहे का याची चौकशी तिथे असणाऱ्या काकांकडे केली. आता पंधरा मिनिटांत सासवड येईलच असे ते म्हणाले. कात्रज त्या आधी येईल असं सांगितलं. त्यामुळे मी कात्रजवरून मग सासवडला जाऊया म्हणून बसची वाट पाहत सावध उभी राहिले. अचानक काका एका बसकडे हात करत 'कात्रज' ओरडले आणि मी न बघता सरळ बसमध्ये चढले. ती बस आमच्या कॉलेजसमोरून गेली तेव्हा मनात शंकेची पाल चुकचुकली... नक्की ही कोणती बस आहे..? दरम्यान आईला फोन करून उशीर होईल कळवलं होतं. बस मिळाली नाही असंही सांगितलेलं. मोबाईलची बॅटरी लो होती आणि भिती आणखी वाढत होती!

तरीही मनात आशा होती की बस कात्रजला जाईल. घड्याळाकडे पाहत चलबिचल आणखी वाढलेली. रस्ता अनोळखी होत चाललेला आणि अंधार आणखीनच गडद होत होता. कंडक्टर काकांना विचारावं म्हणून दोनदा तिनदा सगळीकडे नजर फिरवली. गर्दीच इतकी होती की मला काही सुचलंच नाही. बॅग कशीबशी सांभाळत कोपऱ्यात उभी होते. मोबाईल बाहेरही काढता येईना. तिकिट काढण्यासाठी कंडक्टर काका आले. पण पास दाखवला आणि ते लगेच वळाले. आधीच आपण चुकलोय या भितीने गाळण उडालेली आणि आता आणखीनच होपलेस वाटत होतं. कोणाला विचारायचं पण धाडस होत नव्हतं. कदाचित मी चुकलेय हे त्या क्षणी तरी मला ऐकायचं नव्हतं.

शेजारी उभ्या एका मुलीला शेवटी धाडसाने विचारलं.
'बस कुठे जातेय?' मनातल्या मनात तिने कात्रज म्हणावं म्हणून ओरडत होते मी.
'भक्ती शक्ती.. तुला कुठे जायचंय' ती दिदी म्हणाली आणि माझं अवसान गळालं. तिला सगळी परिस्थिती सांगितली.. ती उतरणार त्या स्टॉपवर उतरले... वळून बसकडे पाहिलं पुन्हा... कात्रज – भक्ती शक्ती लिहिलेलं दिसलं. बस कात्रजवरून भक्ती शक्तीला निघालेली. यापुढे असा वेंधळेपणा करायचा नाही हे मनाशी पक्कं केलं. एव्हाना साडे आठ वाजलेले. आईला फोन करून 'मी चुकलेय' असं धडधडीतपणे सांगितलं. आता बस मिळालीय तर व्यवस्थित येते. सांगून आईची काळजी कमी करण्याचा प्रयत्न केला. क्वचित प्रसंगी मिळणारा बाबांचा ओरडा खाल्ला.. आणि त्या दिदीच्या मदतीने भेकराई बसमध्ये चढले. त्यानंतर काहीच वाटलं नाही. फक्त सकाळी झालेल्या Geology प्रॅक्टिकलमध्ये मी दिलेल्या चुकीच्या उत्तरावर जेव्हा इतरांकडून हसण्याची प्रतिक्रिया आली तेव्हा सरांनी केलेलं स्टेटमेंट आठवत होतं.

'It's ok to do mistakes. Don't shy to ask, don't shy to answer, Its ok to make mistakes. it's totally normal. we are human and we learn from it.'

पण मी एकच चूक दुसऱ्यांदा केली होती.. बस चुकण्याची ही दुसरी घटना होती. मग ठरवलं यानंतर ही चूक पुन्हा करायची नाही. त्या रात्री बाबा घ्यायला भेकराईपर्यंत आलेले.. घरी पोचायला जवळपास अकरा वाजलेले... आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा नव्या उत्साहाने ऑफलाईन कॉलेजला जायचं होतं.

बसमधला माकडासारखा लटकून केलेला प्रवास... कधी चुकून जागा मिळालीच तर लेक्चर्सला शिकवलेल्या कन्सेप्ट रिव्हाईज करणं. गणितं सोडवणं शक्य नव्हतं तर बसल्या बसल्या निदान वाचून काढणं. तर कधी भूक लागलेली असताना फक्त घड्याळ पाहत रस्ता सरण्याची वाट पाहत राहणं...!!! या सगळ्यात एक गोष्ट मागे पडली ना... लक्षात आलं असावं कदाचित. माझ्याही आलेलं. प्लॅन ए आयसर प्रवेश परिक्षा! जी प्रवेश परिक्षेची पुस्तकं बाहेर काढलेली ती धूळखात पडून होती. जेवढा वेळ मी तयारीसाठी द्यायला हवा होता तितका देत नव्हते. सकाळी आठला घरातून निघाल्यावर रात्री नऊ वाजेपर्यंत घरी यायचे. पुर्ण दिवस कॉलेजमध्ये प्रॅक्टिकल आणि लेक्चर्समध्ये जात होता आणि आयसरसाठी ठरवूनही वेळ मिळत नव्हता. दिवसभराचा चार तासांचा प्रवास... जाताना दोनदा, येताना दोनदा बदललेल्या बस.. कॉलेजमध्ये प्रॅक्टिकलसाठी तीन तास उभं राहणं आणि मग चार टोकांच्या चार डिपार्टमेंटमध्ये लेक्चर्ससाठी मारलेल्या फेऱ्या! कोण म्हणतं विद्यार्थ्यांना फक्त बौद्धिक कष्ट घ्यावे लागतात.
हॉस्टेलची पहिली यादी लागली, ज्यामध्ये माझं नाव नव्हतं... मग मात्र बसप्रवास करणं कठीण वाटू लागलं. सकाळी बॅगमध्ये भरलेली पुस्तकं लेक्चरपुरती बाहेर यायची... पण घरी आल्यावर प्रवासाने शिणलेल्या मला त्याकडे बघण्याचीही इच्छा नसे. त्यात रात्रीचं जागरण आणि मी न जुळणारं समिकरण. मग लवकर उठून अभ्यास करायचे. झोप अपूर्ण! कधी डोकं दुखायचं. कधी उभ्याने प्रवास केल्याने पाय, पाठ दुखायची. तरीही मी समाधानी होते. हे सगळं मी निवडलं होतं. आणि मला ते फेस करायचं होतं! शरीर थकलेलं असलं तरीही मन उत्साही असे. आठवड्याच्या सुरुवातीला माझी टू डू लिस्ट ठरलेली असे. आणि आठवड्याच्या शेवटी ही ती टू डूच असे! आयसर मिळवण्यासाठी ॲक्शन प्लॅन ठरलेला होता. पण तो ॲक्शनमध्ये येत नव्हता. याचं कारण म्हणजे वेळ! ना वेळ मिळत होता ना मला काढता येत होता!

या सगळ्या गोष्टींची कल्पना अनघाताईंना दिलेली... वेळोवेळी त्यांचं मार्गदर्शन पण मिळवलेलं. सारं कशासाठी तर अभ्यासासाठी ! मग जर तोच होत नसेल तर काय फायदा? त्यात फर्स्ट इयरचे पेपर सुरू झालेले... सार्थक फॉउंडेशनच्या माध्यमातून अनघाताईंनी जनकल्याण समितीतर्फे पंधरा दिवसांसाठी माझी राहण्याची सोय केली. कोथरूड मध्ये वनाज कंपनीच्या जवळ. प्रशस्त फ्लॅट. सर्व सुखसोयी असलेला ! विशेष म्हणजे कॉलेजपासून फार तर फार वीस मिनिटांच्या अंतरावर... माझ्याआधी तिथे चौघी मुली राहत होत्या.. सगळ्या सुस्वभावी आणि गोड. तसा माझा स्वभाव बोलका असल्याने जुळवून घेण्यासाठी फारसा वेळ लागला नाही. प्रवासाचे तास कमी झाले आणि मला आयसरच्या तयारीसाठी वेळ मिळू लागला, पण आणखी एका गोष्टीमुळे अडचण झाली... ती म्हणजे मला स्वयंपाक करता येत नाही! 'तू मुलगी आहेस तुला स्वयंपाक यायलाच हवा' या संज्ञेपासून माझी आई लांबच होती! तिला मला शिक्षण देऊन माझ्या पायावर उभं राहिलेलं पाहणं जास्त महत्त्वाचं वाटतं! अर्थात तिने प्रयत्न केले होते मला स्वयंपाकघरात घुसवण्याचा... पण मी पळ काढायचे! गोल आकाराच्या पोळ्या करण्यापेक्षा मला फिजिक्समधले डेरिव्हेशन आणि फॉर्म्युले सोपे वाटायचे! भाजीत मीठ घालण्यापेक्षा त्या मीठात असणारे ॲसिड, बेसिक रॅडिकल्स क्वालिटेटिव्ह ॲनालिसिस करून केमेस्ट्री लॅबमध्ये शोधणं सोपं वाटायचं! मला

स्वयंपाक येत नाही यामुळे पहिल्यांदाच मला स्वत:चा राग आलेला. स्वयंपाक शिकण्यासाठी साधा प्रयत्नसुद्धा केला नाही म्हणून! आपल्यासाठी आपल्याला जेवण बनवता यायला हवं ते जीवनावश्यक कौशल्य आहे याची जाणीव झाली! मला स्वयंपाक करता येत नव्हता तरीही या मैत्रिणींनी कधीच तक्रार केली नाही. माझ्यासाठीही त्या स्वयंपाक करायच्या. मी मदत करायचे केवळ! मग स्वयंपाक शिकण्याची सुरूवात... कणिक भिजवण्यापासून झाली. जे संगिता दिदीने शिकवलं होतं. मी मनापासून हरेक गोष्ट शिकत होते. या अनुभवातून एक मात्र शिकले. कोणतीही गोष्ट शिकण्यात कंटाळा करायचा नाही. लॉकडाऊनमध्ये हातात वेळ होता पण फक्त करण्याचा कंटाळा किंवा आवड नाही म्हणून स्वयंपाकघरात पाऊल न ठेवणारी मी, आज नऊ वाजता प्रॅक्टिकल आहे कॉलेजला जायचं, म्हणून पाच वाजताच उठून स्वयंपाकाच्या तयारीला लागत होते! खूप बदल झाले या दरम्यान माझ्यामध्ये... आणि मी ते स्विकारत गेले! घरी न करणारी प्रत्येक गोष्ट केली.. मुळातच ज्या ध्येयाने इथपर्यंत आणलेलं.. त्याचा पाठलाग करताना आता येणाऱ्या इतर अडचणी मला फारशा महत्त्वाच्या वाटल्या नाहीत. अनघा ताईंना रोजचे दोन कॉल तरी जात असतील तेव्हा माझे... एकवेळ आईला केला नाही तरी ठिक पण ताईंना कॉल करायचे.

I believed that We meet people for some reason... आयुष्यात येणारा प्रत्येक माणूस काहीतरी कारणासाठी येतो. तशाच या माझ्या नव्या मैत्रीणीही... जिथे मी राहत होते तिथे राहणाऱ्या संगितादी, दरितादी, सुनिता आणि सावि! सुनिता आणि सावि लहान बहिणीसारख्याच वाटल्या... संगितादी कडून खूप काही शिकले.. तिच्याकडे उत्तम लिडर क्वालिटीज आहेत! तिचं मतांवर ठाम असणं ! वक्तशीरपणा, शिस्त आणि स्वत:ची मतं परखडपणे मांडणं नेहमीच आवडलं. दरितादीने अन्नाचं, मिळणाऱ्या प्रत्येक गोष्टीचं मोल जाणून घ्यायला शिकवलं! घरीही अन्न वाया न घालवण्याचे उपदेश असायचे. पण दरितादीकडून मिळणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे कृतज्ञतेच्या भावनेने बघणं शिकले. जनकल्याण समितीच्या संचालक माईंबद्दल भरपूर ऐकलं या चौघींकडून... त्यांना भेटण्याचा योग आला नाही हे माझं दुर्दैव!

या नवीन मैत्रिणी माझ्यात नव्याने बदल घडवून आणत होत्या! आयसरच्या प्रवेश परिक्षेची पूर्वतयारी जोरदार सुरू होती.. दरम्यान फर्स्ट इयरचे इन सेम पेपर झाले. सगळे अगदी चांगले गेले. मग एक दिवस मी ज्या घरात राहत होते त्या काकूंनी भेटायला बोलावलं. ज्यांनी सढळ हातांनी मुलींना राहण्यासाठी घर दिलेलं. त्यांची लहानशी अपेक्षा होती त्या बदल्यात की मुलींनी रविवारी त्यांच्या घरी जावं. त्यांच्यासोबत गप्पा माराव्यात. त्यांना बागकामात मदत करावी. इतर काही कामं असतील त्यांना हातभार लावावा. त्यांच्या अपेक्षा अगदीच चुकीच्या नव्हत्या. पण माझा दिनक्रम पाहता, आठवड्यातून मिळणारा एक रविवार मला कितीही आवडलं तरीही या पद्धतीने नक्कीच घालवता येणं शक्य नव्हतं! मग पुन्हा कॉल झाले. माझ्या एकटीसाठी बऱ्याच ओळखीच्या, अनोळखीच्या लोकांनी प्रयत्न केले. अनघाताईंची धडपड तर मी स्वत: जवळून पाहिली. या सगळ्यासाठी मी कायम या माणसांची ऋणी राहील.

अखेर वाकडेवाडीला कुलकर्णी काकूंकडे राहण्याची सोय झाली. सार्थकच्या आमच्या अनघाताईंची ओळख असल्यामुळे फारसं काही वाटलं नाही. मी त्यांना भेटले. त्यांच्याशी संवाद झाला आणि मग त्यांच्याकडे राहण्याचं पक्कं ठरलं. कुलकर्णी काकू खूप भारी आहेत. पहिल्यांदा मी त्यांना भेटले होते, तेव्हाच अगदी ऋणानुबंध जुळावेत असं वाटलेलं! माझा असा विश्वास आहे की आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत पोचवण्यासाठी वेगवेगळ्या वळणावर माणसं पेरलेली असतात. योग्य वेळ आली की ही माणसं मदतीला येतात! जसं मी मागे म्हणाले we meet people for reason. काही दिवसांनंतर काकूंकडे रहायला आले आणि महिनाभर चाललेली धावपळ जरा कमी झाली. काकूंकडून खूप काही गोष्टी नव्याने शिकले! काकू अगदी शिस्तप्रिय आणि प्रेमळ स्वभावाच्या आहेत! अगदी पहिल्या दिवसापासून मला मुलीसारखं जपलं त्यांनी!

'हर्षदा तू चुकलीस तर मी रागवणार हा... आणि चांगली कोणती गोष्ट घडली तुझ्याकडून तर कौतुक ही करणार!' असं काकू म्हणाल्या आणि मला हायसं वाटलं! प्रत्येक घराचे काही नियम असतात पद्धती असतात तशाच यांच्याही होत्या आणि मी एकेक शिकून घेत होते! आणि जसं मी आधी म्हणाले.. बोलक्या स्वभावाची असल्याने जुळवून घ्यायला फारसे कष्ट घ्यावे लागले नाहीत! सुरूवातीला काकूंना छोटीशी काही मदत करायचे. त्यांची विचारपूस करायचे. त्यांच्याशी गप्पा मारायलाही आवडायचं. वपू काळे काकूंचे लाडके लेखक. त्यांच्या पुस्तकांवर ही गप्पा रंगतात आमच्या!

एकदा घडलं असं की काकूंकडे कोणी पाहूण्या आल्या होत्या. मी कॉलेजहून आधीच आले होते तर आतल्या रूममध्ये अभ्यास करत बसले होते. पाहुणे आल्यावर मी अगदी दहा मिनिटांसाठी

उठून बाहेर गेले आणि त्यांची चौकशी केली. कधी आलात? काही हवंय का? काकूंना मी मदत करू का काही ? असे साधे जेमतेम दोन तीन वाक्य..! पण काकूंना या गोष्टीचं अप्रूप वाटलं. मी घरी आलेल्या पाहूण्यांची दखल घेतली. त्यांची विचारपूस केली याचं त्यांना कौतुक वाटलं आणि त्यांनी ते व्यक्तही केलं! जरी हे घर माझं नाही, जरी मी त्या पाहुण्यांना ओळखत नाही, तरीही मी त्यांची घेतलेली दखल, केलेली विचारपूस काकूंना आवडली!

इथे आल्यापासून काकूंकडून खूप काही शिकले. रोज नविन काही शिकतेय! कधी स्वयंपाकाचे तंत्र आणि मंत्र. तर कधी हस्तकलेच्या वस्तू! काकूंबद्दल आवडणारी गोष्ट म्हणजे त्यांचं नियोजन आणि ऑर्गनाईज्ड गोष्टी! घरातली अमुक तमुक वस्तू नेमकी कुठेय हे अगदी लगेच सांगतात त्या. इतक्या पद्धतशीरपणे वस्तू नेटनेटक्या ठेवलेल्या आहेत! घरी पाहुणे येणार म्हटलं की काकूंना उत्साह वाटतो. ज्या काही गोष्टी लागणार आहेत त्या आधीच व्यवस्थित ठेवणं, सगळी तयारी आधीच करणं!

द हॅपिनेस ऑफ गिव्हिंग! ही टर्म मी काकूंकडून शिकले.. 'आपल्याकडे असलेलं देता आलं पाहिजे हर्षदा !' हे ही खरंच की! त्या त्यांच्या जवळच्या माणसांसाठी प्रेमाने नविन नविन गोष्टी करत असतात. त्यांचा उत्साहही अगदी वाखाणण्याजोगा असतो.

काकूंनी माझ्यासाठी बनवलेली सांजापोळी म्हणजे स्वर्गसुख..! मी बनवलेल्या पावभाजीचंही त्यांना कौतुक. मी कॉलेजमधून आल्यावर त्यांनी वाटीत माझ्यासाठी खाऊ काढून ठेवणं, मी काढलेल्या रांगोळीचं सगळ्यांना कौतुक सांगणं.. या अगदी लहान गोष्टी असतील, पण मला मी घरापासून दूर राहतेय असं कधी वाटलंच नाही. काकूंच्या प्रेमळ स्वभावामुळे हेही घर माझं झालं! काहीचं नातं नसतानासुद्धा त्यांचं मला इतक्या आपुलकीने वागवणं म्हणजे ऋणानुबंध वाटतात मला..! काकूंकडून शिकलेल्या गोष्टी कधीच विसरू शकणार नाही.. त्यांची शिस्त, त्यांचं प्रेम नेहमीच लक्षात राहिल!

आता पुन्हा नव्याने आणि जोमाने अभ्यास सुरू आहे... पहाटे लवकर उठून अभ्यास करणं.. मग १० ते ५.३० कॉलेज, घरी आल्यावर स्वयंपाकात जमेल ती मदत, आणि पुन्हा दिवसभराचा अभ्यास! छान रूटीन सुरू आहे. रोजच्या नविन आव्हानांना सामोरं जाणं आताशा आवडू लागलं आहे. बस्स स्वत:च्या चौकटींचा विस्तार करतेय. कल्याणी टेक्नोफोर्जमुळे शिकण्याची संधी मिळतेय. सार्थकच्या मदतीने मी पाहिलेली स्वप्नं मी सत्यात उतरवू पाहतेय! त्यातही या अशा अनुभवांतून 'माणूसपण' शिकतेय! खूप काही अनुभवून इथपर्यंत पोहचलेय वगैरे असं नाही म्हणणार, क्यूकी मंजिल अभी दूर है...!!

आपली लाडकी,

**हर्षदा कामठे- प्रोजेक्ट विद्या**

***Education is not just about going to school and getting a degree. It's about widening your knowledge and absorbing the truth about life.***

**Shakuntala Devi**

# १४ पहिला पाऊस....

निळ्याभोर आकाशाच्या कवेत
आज काळे मेघ ही येऊन साठले होते,
ओढ त्या पावसाची होऊन आज
कागदावर काळे शब्दही दाटले होते

झाडे—वेली ही आज चाहूल देत
मला कल्पना देत होते
ओढ असणाऱ्या पावसाची ते गोष्ट सांगत होते
अचानक थेंबे—थेंबे करत—करत
पाऊस कोसळू लागला
आकाशातुन निघालेला तो थेंब
आता जमिनीवर येऊन थांबला

झुळझुळणाऱ्या वाऱ्यासोबत
तो थेंब आनंद देत होता,
उसळलेल्या वाऱ्याची तो लाट देत होता
कल्पनांचा समुद्र होऊन
शब्द कागदावर फिरत होते
शेतावरच्या बांधावर आज ओढे वाहत होते

अचानक माझ्या कल्पना
आता दुसरीकडे फिरल्या
शहराच्या रस्त्यांवर ते बेभान होऊन धावल्या,
शहरातले रस्ते पाहून
पाऊसही थोडा विचारात पडला
मोकळे भकास रस्ते पाहून
पावसाचाही आज इतिहास घडला

पाऊस थांबत होता, तो धावत होता
मोकळ्या डोंगरवाटातून त्याचा प्रवास सुरु होता
हिरव्या गार पानांवर आज त्याचा खेळ सुरू होता,
सळसळणाऱ्या गवताशी
त्याचा आज मेळ होत होता

लांब कुठेतरी साठत
आज तो मला विचार देत होता,
स्वप्नांचा प्रवास होऊन मनात साठत होता
अतरंगी पाऊस असा हा खूप मोठा होता
लेखकी कवींच्या हृदयात शब्द भरत होता

थांबवसं वाटत होतं पण इच्छा होत नव्हती
दरवळणारा मृदगंध होऊन माती सोबत होती,
पण अशावेळेसही लिहीत असताना
लिहायचं भरपूर होतं मला
पण पाने पुरत नव्हती....

- अक्षय खोल्लम
प्रोजेक्ट शिक्षा— प्रकल्प समन्वयक

# १५ The key to an Inspiration



King Janak is the father of mother Sita the mother of the whole universe. people called him vidhey-Raj. that king who has no perception of his body. his sadhana was at that stage where if he puts his hand in the fire he will not come to know it was burning.

The story goes those two pundits in his kingdom. they start discussing. one said, "people call our king vidhey-Raj. How can he be the vidhey-Raj? in midst of so much opulence, look at the palace he has! people just create such a title for nothing" . the second pundit said "let's go and ask him, how he is vidhey-Raj." the first one said, "it's very dangerous. these kings are whimsical. they can give any instruction at any time." "No, no, no! he is a learned scholar who will do us no harm'', the second one convinced the first one.

Both the pundits approached the king. they said, "Maharaj, we are scholars from your kingdom but we have doubt has arisen. you are a king who is beyond the body who has no attachment to this material creation, whose mind is supreme. can you please tell us in midst of such opulence how do you remain vidhey -Raj?"
Janak heard them and said, "your impudence to ask a king how he is vidhey-raj. you have transgressed your rights as a citizen. You need to pay for this.'' two pundits start trembling! the king said " I am going to hang you both, tomorrow. but today you can enjoy." He instructed his servant, "take them away, give them oil massage, let them put on most attractive ornaments, let them have sumptuous food, and put them sleep in softest of beds."

Those two pundits got a treatment of life but they were in no mood to relish it. at night, the first one telling another pundit, I told you so, how foolish of me to listen to you. we are as good as dead now."
The next morning, they were bought to court. Janak said, " I have decided to give one chance for respite would you take it ?" "yes, your honour what is it?", the pundit replied. Janak said, "you will have to walk with a cup of the oil fill up to the brim around my kingdom. If you can come without falling a single drop from that cup, I will forgive you.'' two pundits went out with the cup of oil. Meanwhile, they passed by drama halls but they were not attracted by them because oil should not fall. There were different kinds of shops, their favourite sweet shop clothes shop but nothing pulled their mind. finally, they made back all the oil intact in the two cups. Janak said, "you have done it. Alright! then you are forgiven." the pundit replied, "thank you! Maharaj, you are so kind."

Well! Janak said, "let me ask you a question. last night, you have received wonderful luxury and opulence to enjoy. did your mind tempted by them?" they said, "no Maharaj, absolutely not! death is rendering on our head, we knew in the morning we will be hanged." Alright! and today you are made to walk around Janakpuri did your mind go to various gratifications of market."
They answered, "no, Maharaj! where is the question? we have to retain oil in the cups"
Jank said, "look, it was the same world. yet you are detached from all of the objects of enjoyment and luxury because your intellect realized that at this movement something else is important. if we are not careful then we will die in the same way you asked me that in midst of opulence how do I remain vidhey? the answer is simple. I just remember my death and thought that this precious life can be wasted away. every moment is valuable. I must put it into good use by keeping proper knowledge in my intellect, I sustain my state of detachment from the world.
Moral: The key to inspiration is a strong reason for doing something realized to our intellect.

**Gayatri Parsaya. Project Vidya**

# १६ A journey that has just begun...

SARTHAK WELFARE FOUNDATION




From a small town of Marathwada to the prominent locality of Mumbai, my journey has been full of turns and twists. And what has played vital role is the self-set rule of being consistent.

On 24th June 2022, I will complete my 10 years outside of home. 7 years in Pune and 1 year in Mumbai to be precise. In all these years, a day didn't pass when I didn't think of my career, when I didn't take action to reach closer to my goals.

On some lazy days, I'd do nothing, sit idle and go to the bed at the end of the day. Then I would think – "How could you possibly not study at all the whole day? Someone has put faith in you. Don't let that person down". I would throw the comforter aside, switch on the light and study for at least an hour. This habit of studying regularly has led me somewhere finally, somewhere good.

One of the important forces which didn't let me lose my focus was (she still is) the founder of Sarthak Welfare Foundation, Mrs. Swati Namjoshi. 0 % interference in my career choices and 100% guided support is what she's given. Its just not me who has been consistent in my journey, she's equally rather more consistent when she had to play her role.

One meeting with Mrs. Namjoshi ji I remember. I had badly failed in very first interview for the post of assistant professor (Law). So, I went to her and sought tips on how to crack the interviews. For one entire hour she taught me the skill of facing the interviews. I came back home, applied the techniques and cracked all next 4 interviews. This is something which matters to me. Because of her decade long patience, financial support and most importantly the faith, now I'm a law professor in Mumbai's top most college that is Ruparel college, Mahim.

First two months in Mumbai were very difficult for me since I was not paid my salary due to technical issue. It was very awkward to ask for money to friends or family when I had a job. Expenses in Mumbai-everyone knows. But I somehow survived those days like I had in the past. It's said that journey is beautiful than the destination and indeed it's true. It's so far so good. Many more miles to go though.

It requires a lot of patience to enjoy the fruits of sown seed. one can't afford to change the tracks so I didn't. My tree gave the season's very first fruits. The fruits that I can enjoy, my family can enjoy. I can also give it to the hungry and thirsty people. This gives me immense satisfaction, a feeling of content. Well, have I reached my destination? Surely not. I just have shifted from other side of the table to this side. This side makes me more responsible and answerable as well. I'll try my best to justify the trust casted upon me.

**Sanket Mainderkar.**

सार्थक मैत्र

# १७ धडपडणाऱ्या मुलांची गोष्ट

SARTHAK
WELFARE FOUNDATION

***"For me, becoming successful isn't about arriving somewhere or achieving a certain aim. I see it instead as forward motion, a means of evolving, a way to reach continuously toward a better self. The journey doesn't end."***
***— Michelle Obama***

यश कशाला मानावं आणि यशस्वी कोणाला म्हणावं याबद्दल जसे अनेक मतप्रवाह आहेत तशी यशस्वी होण्याची व्याख्या देखील प्रत्येकाची वेगवेगळी असते असं मला वाटतं.

उच्च शिक्षण, प्रतिष्ठित नोकरी, भरपूर पगार, व पैसा हे जरी जगाचे, यश मोजण्यासाठीचे सर्व साधारण मापदंड आहेत. तरी.. .. भरपूर पदव्या म्हणजे तो विद्यार्थी यशस्वी झाला असं समजावं का? चार पाच आकडी पगार मिळतो म्हणून एखादा यशस्वी असतो का? निव्वळ हातात पैसा खेळायला लागला म्हणजे ते मूलं यशस्वी होणारच असं मानायचं का? ह्या प्रश्नांची उत्तरे अजून संदिग्ध आहेत. जशी सुखाची, आनंदाची व्याख्या ज्याची त्याने करायची तशीच स्वत:च्या यशस्वीततेची व्याख्या स्वत:च करायला हवी नाही का?

भरपूर पदव्यांबरोबरच विचारांची परीपक्वता आणि ज्ञानलालसा आली, बौद्धिक, मानसिक उत्कर्ष झाला तरच ते खरं शिक्षण! भरपूर पैशाबरोबरीने, स्वत:चा आणि दुसऱ्याच्या जीवनातील आनंद द्विगुणित करण्याची कला शिकता आली तरच ती खरी समृद्धी! हातातल्या सत्तेचा, पॉवरचा विनियोग स्वत:च्या व लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल करण्यासाठी केला तरच ती खरी ताकद! तेच खरं यश असं मानते मी!

विन्स्टन चर्चिल यांचे एक सुंदर वाक्य आहे....

"Success is not final, failure is not fatal; it is the courage to continue that counts"

यशस्वी होणं म्हणजे सतत प्रगतीशील राहणं हे जितकं खरं तेवढच, संकटाच्या, संघर्षमय काळात धीरानं उभं राहणं, दुख:द घटनांमुळे खचून न जाता परिस्थितीचा सामना करणं, आणि हार न मानता आपल्या ध्येयाकडे वाटचाल करत राहणं. मोहमयी क्षणांमधे आत्मभान आणि समाजभान न सोडणं, क्षणीक लोभांना बळी न पडता, सत्य आणि चांगल्या गोष्टींची कास धरणं....! सार्थकच्या मेंटॉरींग प्रकल्पात आमच्या मुलांनी अशा प्रकारे यशस्वी व्हावं याकरताच आमच्या सर्वांचे प्रयत्न एकवटले आहेत!

मुलांनी पुस्तकी शिक्षणाबरोबरच, समृद्ध आणि सुसंस्कृत व्हावं याच ध्येयाने सार्थक मैत्र हा आमच्या Mentoring प्रकल्पाला काही वर्षांपूर्वी आम्ही सुरवात केली. पुस्तकी शिक्षणाबरोबरच जीवन कौशल्य आत्मसात करावी या करता आम्ही कायम प्रयत्नशील होतो. मुलांशी संवाद, वेगवेगळ्या विषयांवरील चर्चा, ते अनुभवसमृद्ध व्हावेत म्हणून विविध कार्यशाळा, सहली व उपक्रम करत होतो. आज केवळ १५ मुलांबरोबर सुरू केलेला आमचा प्रवास ३५० मुलांपर्यंत पोहोचला आहे. दहावी झाल्यानंतर या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी आम्ही जास्तीतजास्त प्रयत्न करत आहोत. मुले यशस्वी होऊन स्वत:चे एक स्थान निर्माण करतील याबद्दल मी नि:शंक आहे.... कारण कोविडच्या झंझावातातसुद्धा आमच्या एकाही विद्यार्थ्यांनी शिक्षण सोडलेले नाही. घरातली कामे करता करता, कष्टाने स्वत:चा आणि कुटुंबियांचा निर्वाह करुन, मिळेल ते, जमेल ते काम करीत मुले आपल्या ध्येयापासून विचलित झालेली नाहीत.

स्विगी—झोमॅटोची डीलिव्हरी करुन कुटुंबाचा चरितार्थ चालवणारा आणि उरलेल्या वेळात कॉंप्युटर इंजिनीअरिंगचा अभ्यास करणारा संतोष आज एका स्टॉक सिक्युरिटी फर्ममधे नोकरीला आहे, सन्मानाने पगार मिळवतो आहे, एकीकडे शिक्षण सुरूच आहे!

कोविडच्या लाटेमधे आईची नोकरी गेली, भाडं परवडत नाही म्हणून जागा सोडून गावी जावं लागलं, तरीही जिद्दीने मिळेल ती नोकरी करणारी आणि आईला आधार देणारी, पण अजूनही MBA चा अभ्यास करुन बँकेत किंवा MNCमधे काम करायची स्वप्ने बघणारी आमची सायली आहे.

कोविडमधे वडीलांच छत्र हरवलं, प्रेमाने सांभाळ करणारी मावशी गेली, त्यामुळे CA होण्याची स्वप्न बघणाऱ्या प्रांजलला तातडीने गावाला जाऊन शेती हातात घ्यावी लागली. आपण CA करु शकणार नाही म्हणून आपल्या धाकट्या भावाला पुण्याला शिक्षणाला पाठवणारा आणि कर्जात बुडालेल्या शेतीतून पिक काढणारा 'मॅडम दोन वर्षांत सगळ्या कर्जाची परतफेड करतो बघा बँकेची!' असं मोठ्या आत्मविश्वासाने सांगणारा प्रांजल हा माझ्याकरता हिरो आहे!

सर्वसामान्य घरातील मुलीसुद्धा नर्सिंगच्या करिअरकडे उपेक्षित नजरेने बघतात, पण 'ताई, मला लोकांची सेवा करायला आवडते, लोकांना मदत करुन मला आनंद होतो, मी नर्सिंगच करणार आहे!' असं ठामपणे जेव्हा आमचा, झोपडपट्टीत राहणारा परशुराम सांगतो, हॉस्पिटल मधे शिकत असताना आणि कोविडमधे काम करतानासुद्धा जो आपली कलात्मकता जिवंत ठेवतो, ओरीगामी कर, कविता लिही, सायकॉलॉजीचा अभ्यास कर.... अशा अनेक गोष्टी करताना हसतमुख राहतो.... तो त्याचं पैशाविनाचं आयुष्यदेखील समृद्धपणे जगतो नाही का?

कोविड काळात वडिलांची चहाची टपरी बंद पडली म्हणून भाजीच्या ट्रकवरती काम करुन, हॉटेलमधे काम करुन आत्मसन्मानाने पैसे मिळवणारा आणि हे सर्व सांभाळून, कोविड सेंटरमधे स्वयंसेवक म्हणून आपलं कर्तव्य पार पाडणारा, ऑनलाईन शिकताना बँकेतील नोकरीची संधी मिळवणारा पुष्कर. .. ह्याने एखाद्या डीग्रीएवढेच सखोल ज्ञान आत्मसात केले आहे.

वडीलांचं प्रदीर्घ आजारपण व मृत्यु बघणारा, आई व बहीणीला धीर देऊन स्वतःचं तांत्रिक प्रशिक्षण पूर्ण करणारा मुकेश, गणितासारखा अवघड विषय घेऊनसुद्धा त्यात पोस्ट ग्रॅज्युएट होणारी आणि पुढे संशोधनाचा विचार करणारी आदिती, आई वडीलांनी वयाच्या अठराव्या वर्षीच लग्न करुन दिलं तरी जिद्दीने, चिकाटीने कॉलेज पुन्हा जॉईन करणारी आणि बक्षिसे मिळवणारी सोनाली, इंजिनीअरिंग करणारी आणि हॉस्टेलचा



खर्च परवडत नाही म्हणून एक वेळ जेऊन पैसे वाचवणारी साक्षी, आईच्या पश्चात, आपल्या आजारी वडिलांची सेवा करुन धाकट्या भावंडांची काळजी घेताना, पार्ट टाईम नोकरी करुन घर चालवणारी राजश्री! कधी फटाके वीक तरी कधी उटणं—अगरबत्ती असा दिवाळी पॅक, MBA करता करता सतत वेगवेगळ्या एंटरप्राईझिंग आयडीया प्रत्यक्षात उतरवणारा आमचा शशांक,... नावं तरी कोणाकोणाची घ्यावीत?!
या संघर्षमय प्रवासात ती एक ना एक दिवस ती त्यांच धेय्य गाठतील आणि खऱ्या दृष्टीने स्वतःचं आणि आमचं सर्वांचे आयुष्य समृद्ध करतील ह्याची खात्री आहे मला!

आपल्या प्रत्येकाकडे दुसऱ्याला देण्यासारखं खूप काही असतं. अनुभव, ज्ञान, पैसे, वेळ.. सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रेम, विश्वास आणि अनुकंपा! सार्थक मैत्र मधल्या आमच्या मुलांबरोबर ह्यातला काही अंश शेअर करताना, आमच्या वाटेला आलेले आनंदाचे, समाधानाचे आणि अभिमानाचे क्षण अफाट आहेत! त्यांच्या ह्या जिद्दीने केलेल्या प्रवासातच सार्थक चे यश आहे.
आमच्या या धडपडणाऱ्या मुलांच्या खाचखळग्यांनी भरलेल्या पायवाटेवर एक छोटासा दिवा लावण्याच्या, आमच्या प्रयत्नांने त्या पायवाटेबरोबर आमचे अंतरंग देखील उजळून टाकले आहे!

**स्वाती नामजोशी**
डायरेक्टर
सार्थक वेलफेअर फौंडेशन

***You never fall untill you stop trying.***
**Albert Einstein**

# Donors & Well Wishers

Mrs. Archana Kamalakant Kulkarni
Umesh Digambar Ikhe
Anjali Nitin Anturkar
Neela Vishnu Marathe
Purushottam Gopal Deodhar
Madhav Vaidya
Nilima Limaye
Anant Pethkar
Milind Nene
Jayashree Subhash Deshkulkarni
Sandeep Sahasrabudhe
Tanmay Kulkarni
Pooja Ketkar
Kaustubh Arun Anwekar
Alka Surendra Borse
Susmit Arun Mogarkar
Amit Sadanand Bapat
Bharat Vidyadhar Samant
Tapan Krishnakant Mankame
Prakash Anant Avachat
Amol Nandkishor Joshi
Kavita Suhas Joshi
Tukaram Balkrishna Dudhale
Meenal Milind Dhaigude
Sanyogita Katdare
Prachi Anil Naik
Rajesh B.Patil
Radhika Rao
Jayant Ramchndra Nene

Sachin Dabke
Supriya Vikas Deodhar
Jayashri Gangal
Sarita Mukund Deodhar
Rahul Yashvant Sahasrabuddhe
Medha Anant Nanivadekar
Parshuram Ganesh Date
Anjali Hanamsagar
Manjiri Agashe
Swapna Thete
Makarand Yedurkar
Makarand Joglekar
Padmaja Date
Anand Naik
Rahul Ramesh Juvekar
Karuna More
Shraddha Dhumne
Shirish Ketkar
Mayuri Milind Rokade
Suresh J. Vispute
Vivek Mahadev Wagh
Bindumadhav Janardan Joshi
sanjay Gajanan Joshi
Shraddha Namjoshi
Kaustubh Arun Anwekar
Rashmi Sunil Patwardhan
Nupura Kale
Shubhangi Deodhar
Pratibha P. Ghatge
Sujata Bhat
Vinay Gokhale
Sunil Ambike
Suresh Karve

Vivek Karve
Kiran Paranjape
Anagha Hanamsagar
Shivani Pankhawala
Nitin Narandra Vaidya
Neeta Kulkarni
Shriya Kulkarni
Nitin Kulkarni
Sanket Maindarkar
Vishwajeet Godbole
Manjiri Laghate
Aarti Pawar
Rashmi Kulkarni
Reshma Kulkarni
Sanjay Palasha
Dhanashri Bhate
Milind Shinde
Nisha Ashok Agarwal
Mukul Yellapurkar
Aniket Nitin Kulkarni
Danesh Jayantilal Shah
Vijay Ratanchand Oswal
Farsighted Systems Private Limited
Jyoti Chandrakant Kale
Milind Narhar Lele
Mr.Vaibhav
Ms. Asmita
Mr. Chaitanya
Ms. Priya
Mr. Uday
Ms. Snehal
Ms. Sonali

# मनःपूर्वक धन्यवाद

## Donners & Associates

### Associates

KALYANI TECHNOFORGE
Kalyani Techno forge ltd

TENNECO
Clean Air India Pvt.Ltd.

CAREER DISHA
Career Disha

SEVA SAHAYOG
Celebrating Humanity
Seva Sahayog-
Vidyarthi Vikas
Yojana

Opus
Software Solutions
OPUS Consulting Solutions
& Opus Rural Foundation

EMERSON
Emerson

Rotary Club of Pune Hillside, Pune

म.टा.
हेल्पलाइन
Ma.Ta. Helpline





म.टा.सार्थक धान्य वाटप




म.टा.सार्थक होम व्हिजिट





म.टा.सार्थक : लॅपटॉप वाटप

## सार्थक मैत्र दिवाळी प्रोग्रॅम







## कोविडनंतरची पुर्नभेट











लाईफ मॅप ॲक्टिव्हिटी



अर्थ सहाय्य- मुकेश पेद्दे



हेल्थ कॅम्प : आरोग्यम् धनसंपदा- आरोग्य शिबिर व औषधे वाटप



नारी शक्ती : आरोग्य आपुल्या हाती - प्रोग्रॅम



सार्थक मैत्र : करियर टेस्टिंग व कौन्सिलिंग



सार्थक मैत्र : लॅपटॉप आणि धान्य वाटप



प्रोजेक्ट विद्या : लॅपटॉप व मोबाईल वाटप








प्रोजेक्ट शिक्षा : कौतुक सोहळा







प्रोजेक्ट शिक्षा

स्वाती नामजोशी यांना रोटरी क्लब ऑफ डेक्कन जिमखानातर्फे एक्सलन्स ॲवार्ड प्रदान













स्वाती नामजोशी यांना महर्षी कर्वे संस्थेच्या हिराबेन नानावटी सेंटर फॉर मनेजमेंट स्किल्स यांच्या वतीने वुमन्स अचिव्हर्स पुरस्कार प्रदान

SARTHAK

WELFARE FOUNDATION

*Making Life Meaningful*

# सार्थक निरंतर

## शिंपल्यातील मोती...











## EDUCATION
Teach - Discover - Develop - Empower



## HEALTH
Physical - Mental - Psychological - Emotional

SARTHAK
WELFARE FOUNDATION
*Making Life Meaningful*



## MENTORING
Interact - Understand - Empathise - Guide



## IMPARTING SKILLS
Learning - Development - Opportunity - Employability


## Sarthak Welfare Foundation

**Registered Office :** Flat No. 4, Abhishek Complex, Happy Colony, Lane No.3,
Next to Shashwat Hospital, Kothrud, Pune 411 038.

**Office :** Flat No 4, Pancharatn Apartment, opp. Raja Shivrai Pratishtan school, Rambaug Colony,
Kothrud, Pune, Maharashtra 411038
9766 078 146/ 8830 979 640 / 9766 308 815
contactsarthakfoundation@gmail.com careerdisha2020@gmail.com
www.sarthakwelfarefoundation.org
makealifemeaningfull@gmail.com